विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

वर्ष चौथे । अंक सातवा । जुलै २०२५



## विस्तारीत राज्य कार्यकारिणी बैठक
## शहादा (जि. नंदुरबार)

# विस्तारीत राज्य कार्यकारिणी बैठक । शहादा (नंदुरबार) । क्षणचित्रे

## मनोगत व्यक्त करताना


ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मा. मेधा पाटकर



मा. प्रा. मकरंद पाटील



मा. डॉ. शशांक कुलकर्णी



मा. डॉ. बी. डी. पटेल



राज्य अध्यक्ष मा. माधव बावगे



राज्य कार्याध्यक्ष मा. संजय बनसोडे



विस्तारीत राज्य कार्यकारिणी बैठकीचे उद्घाटन करताना सेवीबाई वसावे, फोतीबाई वसावे, बोंडीबाई राऊत, प्रा. मकरंद पाटील, माधव बावगे, संजय बनसोडे, डॉ. शशांक कुलकर्णी, डॉ. बी. डी. पटेल आदी.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

संपादक मंडळ

• संपादक
डॉ. नितीन शिंदे

• कार्यकारी संपादक
उत्तम जोगदंड

• सहसंपादक
डॉ. श्यामसुंदर मिरजकर

• व्यवस्थापकीय संपादक
अजय भालकर

• सदस्य
डॉ. बाळू दुगडूमवार
प्रल्हाद मिस्त्री
राजेंद्र फेगडे
हंसराज महाले

• सल्लागार
किशोर बेडकिहाळ

• प्रकाशक
संजय बनसोडे



• कार्यालयीन पत्ता
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव
पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर
ता. वाळवा, जि. सांगली ४१५४०९
मो. ९३५९०८०८२०
email : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in



• अंक वितरण
आरबाज पटेल (७७७६०६१८३३)

• मुखपृष्ठ
सचिन भोसले / कोल्हापूर

• स्वागतमूल्य : ₹ २०/-

• पृष्ठ संख्या : ४४

**वार्षिक वर्गणी**

४०० रू. (व्यक्तीसाठी) ५०० रू. (संस्थेसाठी)

वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा :

विवेक जागर संस्था
ICICI बँक, धुळे
खाते नंबर : 646301002757
IFSC Code : ICIC0006463
Scan & Pay



विज्ञान निर्भयता नीती

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

आम्ही वारस विवेकाचे

ISSN : 2584-0398


# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका


R.N.I.No. MAHMAR/2022/83669

वर्ष चौथे । अंक सातवा । जुलै २०२५


## अनुक्रमणिका


**संपादकीय** ४

**कार्याध्यक्ष संवाद**

• ...आणि मी कार्याध्यक्ष झालो / संजय बनसोडे ५

**विचारमंथन**

• अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यातून मानवता वाचवू या.../ मेधा पाटकर ७

**परिसंवाद**

**संत परंपरा : अंधश्रद्धा निर्मूलन ते मानवता धर्म**

• संविधानातील मूल्यांमध्ये संत विचारांचेच प्रतिबिंब/ह. भ. प. श्यामसुंदर महाराज सोन्नर ११

• महा. अंनिस संतांचीच वैचारिक वारसदार/ ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर १६

**प्रासंगिक**

• संजय बनसोडे : संघटनेच्या मुशीतून घडलेले नेतृत्त्व / प्रा. परेश शाह २०

**वृत्तांत**

• विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठक / डॉ. टी. आर. गोराणे २८

**खबरबात**

• महा. अंनिसची खबरबात / हंसराज महाले ३७



'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

# ।। सं पा द की य ।।

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची विस्तारित राज्य कार्यकारिणीची बैठक आदिवासीबहुल जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नंदुरबारमधील शहादा या तालुक्याच्या ठिकाणी दि. ३०, ३१ मे आणि १ जून २०२५ रोजी अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाली. दर तीन वर्षांनी संघटनेच्या संरचनेनुसार लोकशाही प्रक्रियेतून राज्य कार्यकारिणीची निवड यावर्षीही शांततेत आणि कोणताही गोंधळ न होता पार पडली. सामाजिक आणि संवेदनशील क्षेत्रात काम करणाऱ्या संघटनेची लोकशाही मूल्यांप्रति असलेली बांधिलकी यानिमित्ताने अधोरेखित झाली. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्यापासून चालत आलेल्या कार्यपद्धतीशी सुसंगत ठसा उमटवलेल्या माधव बावगे यांची राज्य अध्यक्षपदी तर संजय बनसोडे यांची राज्य कार्याध्यक्षपदी झालेली निवड कार्यकर्त्यांच्यामध्ये उत्साह वाढवणारी आहे. हे दोघेही संघटनेला भविष्यामध्ये एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवतील यात कार्यकर्त्यांना तिळमात्रही शंका वाटत नाही.

अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हे श्रद्धा आणि भावनेच्या क्षेत्रात परिवर्तन करणारे असल्याने ते जोखमीचे असते. तरीही कार्यकर्ते तन, मन आणि धनाने या कार्यात झोकून देऊन काम करत आहेत. बैठकीला मिळालेला शाखा, जिल्हा व राज्य पातळीवरील पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, महिला आणि तरुणांचा वाढता सहभाग आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी आयोजक म्हणून दाखवलेला जिव्हाळा, यामुळे एक वेगळेच चैतन्य निर्माण झाले होते. नंदुरबारसारख्या आदिवासी भागात संघटनेची बीजे खोलवर रुजल्याचे हे संकेत आहेत. डॉ. दाभोलकरांच्या हौतात्म्यानंतर देखील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती निर्भयपणे आणि अधिकारवाणीने समाजामध्ये कार्यरत असल्याचे प्रकर्षाने जाणवले. संघटनेसमोरील सध्याचे आव्हानात्मक आणि प्रतिकूल वातावरण लक्षात घेतल्यास, हे चित्र अत्यंत उत्साहवर्धक होते.

नर्मदा बचाव आंदोलनाच्या मेधाताई पाटकर यांची पुरस्कार वितरण समारंभासाठीची उपस्थिती आणि मार्गदर्शन, तसेच पुरस्कारार्थींच्या पाठीवर दिलेली कौतुकाची थाप, विवेकी विचारांच्या प्रसारासाठी कार्यकर्त्यांना निश्चितच प्रेरणादायी ठरेल. 'संत परंपरा - अंधश्रद्धा निर्मूलन ते मानवताधर्म' या विषयावरील परिसंवाद विशेष उल्लेखनीय ठरला. या परिसंवादात ह. भ. प. शामसुंदर सोन्नर आणि ह. भ. प. ज्ञानेश्वर बंडगर महाराज यांनी केलेली मांडणी महत्त्वाची ठरली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची नाळ संत परंपरेशी जोडलेली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आणि समितीचा वारकरी संप्रदायाशी असलेला विचारात्मक संवाद अधोरेखित केला.

आज काही बाबा-महाराज अध्यात्माच्या नावाखाली समाजात भ्रम पसरवत आहेत. संत परंपरेने समाजप्रबोधनासाठी स्वीकारलेला अध्यात्माचा शुद्ध वारसा या बाबांकडून अक्षरशः पायदळी तुडवला जात आहे. अभंग, अखंड, श्लोक, दोहे यांच्या माध्यमातून संतांनी निर्माण केलेल्या वैचारिक संपत्तीचा या तथाकथित आध्यात्मिक नेत्यांच्या वाणीमध्ये लवलेशही आढळत नाही. इतर धर्माची तसेच धर्मीयांची आणि आपल्याला वैचारिक अंगाने विरोध करणाऱ्यांची हेटाळणी करणे, त्यांना धमकी देणे आणि सत्ताधारी वर्गाच्या सहाय्याने आपला संप्रदाय आणि वैयक्तिक संपत्ती वाढवणे, हेच आजचे वास्तव झाले आहे. काहीजण तंत्रज्ञानाचा वापर करून चमत्कारांचे प्रयोग सादर करत आहेत, तर काही अवैज्ञानिक संस्थामधून जनतेची दिशाभूल करत आहेत. यामुळे अंधश्रद्धेच्या नव्या कल्पनांना खतपाणी मिळत आहे. त्यांच्या दरबारात लाखोंचा समुदाय कोणताही प्रश्न न विचारता सामील होत असल्याचे चित्र विश्व गुरु होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या समाजासाठी भूषणावह नाही.

समाजप्रबोधनाच्या इतर प्रकारांबरोबरच संत परंपरेतून आलेल्या कीर्तन, भारूड आदींच्या माध्यमातून देखील अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार पोहोचवण्याची गरज आज अधिक तीव्रतेने जाणवत आहे. त्याच हेतूने ह. भ. प. सोन्नर आणि ह. भ. प. बंडगर महाराजांनी केलेल्या विवेकनिष्ठ विचारांची मांडणी वाचकांसाठी या अंकात प्रसिद्ध करीत आहोत. त्यांच्या विचारांचे शब्दांकन वाचकांना नक्कीच भावेल, असा मला ठाम विश्वास आहे. संत-समाजसुधारकांचा वैचारिक वारसा पुढे घेऊन जाणे हीच आज प्रबोधन चळवळींसाठी आवश्यक बाब बनलेली आहे, त्यासाठी प्रयत्नशील राहू या. विवेकाचा आवाज बुलंद करू या.

**डॉ. नितीन शिंदे**
संपादक

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



# ...आणि मी कार्याध्यक्ष झालो

**संजय बनसोडे ।** इस्लामपूर (सांगली)
मो.९८५०८९९७१३

गेली ३५ वर्षे सातत्याने अंधश्रद्धा निर्मूलन करणाऱ्या, हजारो बुवाबाबांचा भांडाफोड करणाऱ्या, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार, प्रसार करणाऱ्या आणि समाज विवेकी बनावा याचा ध्यास घेतलेल्या राज्यव्यापी जनचळवळीचा म्हणजेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा राज्य कार्याध्यक्ष म्हणून निवड होणे ही माझ्यासाठी मोठी आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. ही फार मोठी जबाबदारी आहे; याची मला नम्र जाणीव आहे. या क्षणी माझ्या मनात कृतज्ञतेची आणि अधिक जबाबदारीची भावना आहे. संघटनेने माझ्यावर दाखविलेल्या या विश्वासाबद्दल मी मनापासून संघटनेचे ऋण व्यक्त करतो. या निवड प्रक्रियेच्या निमित्ताने परत एकदा सिद्ध झाले की, एक सामंजस्यपूर्ण लोकशाहीची भावना संघटनेने आत्मसात केली आहे. मला माझ्या या सर्व साथींचा सार्थ अभिमान आहे; कौतुक आहे. मतभेद, मनभेद, अहंकार, सत्ताकांक्षा, रस्सीखेच असा सार्वत्रिक अनुभव असताना, संघटनेत रुजलेली समंजस लोकशाही हे आपल्या संघटनेचे सर्वोच्च भांडवल आहे. हीच खरी आपली कमाई आहे. येत्या काळात ती टिकवणे, वाढवणे ही नेतृत्व म्हणून माझी प्राधान्याची जबाबदारी असेल.

शहादा (जि. नंदुरबार) येथे नुकत्याच पार पडलेल्या संघटनेच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीने दिलेल्या निर्णयाने मी भारावलेलो आहे. सलगपणे गेली ३४ वर्षे संघटनेत अत्यंत उत्साहाने आणि तळमळीने केलेल्या कामामुळेच संघटनेने ही मोठी जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे. राज्य कार्याध्यक्ष म्हणून ज्या क्षणी माझे नाव जाहीर करण्यात आले, त्यावेळी कार्यकर्त्यांनी जल्लोष केला, टाळ्यांचा गजर केला. तो क्षण आयुष्यभर संस्मरणीय राहील. त्याच वेळी माझे काढलेले स्केच डिस्प्ले केले गेले, तो क्षणही माझ्यासाठी अविस्मरणीय बनला आहे. संघटनेतील कोणतेही पद हे जबाबदारीने पार पाडण्यासाठी असते ही कर्तव्यभावना दीर्घकाळ संघटनेत काम करीत असल्याने पदाची हवा माझ्या डोक्यात अजिबात जाणार नाही याची मी खात्री देतो. संघटनेच्या इतिहासातील मी चौथा राज्य कार्याध्यक्ष आहे. संस्थापक कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर, त्यांच्या हयातीत अविनाश पाटील कार्याध्यक्ष झाले होते आणि मागील तीन वर्षात हे पद माधव बावगे यांनी सांभाळले होते. आणि आता माझ्याकडे ही जबाबदारी आली आहे.

मी संघटनेच्या मुशीतून घडलेला कार्यकर्ता आहे. इस्लामपूर शाखेचा कार्यकर्ता, पदाधिकारी, सांगली जिल्ह्याचा कार्याध्यक्ष, राज्य कार्यकारिणी सदस्य, राज्य सरचिटणीस, राज्य प्रधान सचिव अशी माझी टप्प्या टप्प्याने वाटचाल झालेली आहे. संघटनेतील कामाचा अनुभव आणि जबाबदाऱ्या वाढत गेल्या आणि संघटनेच्या कामाला प्राधान्य देत असल्याने विविध पदांची जबाबदारी संघटनेने आणि संघटनानेतृत्वाने दिली. संघटनेची गरज आणि माझी आवड यांची सांगड घालत आजवर जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. शहीद डॉ नरेंद्र दाभोलकर आणि अविनाश पाटील यांनी संघटनेच्या विविध मोहिमा, प्रबोधन यात्रा यांचे नेतृत्व करण्याची संधी आणि अवकाश मला दिला. माजी कार्याध्यक्ष माधव बावगे यांनीही संघटनात्मक कामात भरपूर वाव दिला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही कार्यकर्ते घडविणारी एक मोठी कार्यशाळा आहे; हे मी अभिमानाने सांगू शकतो. संघटनेतील माझ्या दीर्घ कार्यकाळात मी घडत गेलो, स्वतःला बदलत गेलो आणि कदाचित इतरांनाही घडविण्यास उपयुक्त ठरलो असेन. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा खून, त्यानंतर करोना काळातच संघटनेमध्ये झालेले दोन भाग या घटनांनी मी आरपार बदलून गेलो. या दोन्ही घटनांनी खूप वेदना झाल्या होत्या, मन सुन्न झाले होते. मात्र याही परिस्थितीत सर्वांनी एकमेकांना सावरलं; पुन्हा सामर्थ्याने उभे राहण्याचं बळ मिळविले. माझ्यासह राज्यातील अनेक साथींनी निर्धाराने संघटनेचे कार्य पुढे नेण्याचा संकल्प केला. महा. अंनिस आज ठामपणे, सशक्तपणे विवेकाचा आवाज बुलंद करीत आहे. आज संघटना सर्वार्थाने राज्यभर विस्तारली आहे. अनेक पातळींवर संघटना

आपल्या कामाचा ठसा उमटवीत आहे. समर्पित कार्यकर्त्यांची, पदाधिकाऱ्यांची मोठी फौज सध्या अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत कार्यरत आहे. संघटनेची कार्यकारी समिती खूप क्षमतेने कार्यतत्पर आहे. नूतन राज्य कार्यकारिणीत अत्यंत उत्साहाने आणि निष्ठेने काम करणारे पदाधिकारी आहेत. नाविन्य आणि उपक्रमशीलता जपणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांची एक मोठी फळी तयार झाली आहे. ही मोठी आश्वासकता आहे. आज सर्व जिल्ह्यात संघटनेचे काम सुरू आहे. यातील काही मोजके जिल्हे संघटनात्मकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याची गरज आहे. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेची गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ ही सुद्धा कामाला उभारी देणारी आहे. शहाद्याच्या राज्य कार्यकारिणीतून अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते प्रेरणा घेऊन अधिक सक्रिय झाले आहेत.

धर्मांध राजकारणाची सरशी होण्याचा हा काळ आहे. त्याच आधारे धर्मांध संघटनांचा उन्माद सुरू आहे. पण मला वाटते, या काळाचा फार बाऊ करू नये. इतिहासात डोकावून पाहिले, तर परिवर्तनवादी संस्था, संघटनांना कोणताच काळ कधीच अनुकूल नव्हता. सर्व काळात त्यांचा इतिहास हा संघर्षाचाच राहिला आहे. आजच्या काळात राजकारण आणि धर्मांध शक्ती व नफेखोर भांडवलदारी यांची झालेली युती हे आव्हान नक्कीच आहे. थोडा नीट विचार केला, तर हे आव्हानच आपल्याला लढण्याचे बळ देऊ शकते, लढण्याची प्रेरणा होऊ शकते. याच काळात आपल्याला जादूटोणाविरोधी कायदा देशव्यापी करण्यासाठी लढावं लागणार आहे. या विषयावर काम करणाऱ्या देशातील अनेक संस्था, संघटनांचं नेतृत्व करण्याची जबाबदारी आपल्याला स्वीकारावी लागणार आहे. यासाठी संघटनेचा सर्वार्थाने विस्तार होणे आवश्यक आहे. युवा आणि महिला या दोन घटकांना जोडून घेतल्याशिवाय संघटना पुढे नेता येणार नाही. त्यासाठी सातत्याने कृतिशील राहावे लागेल. संघटनेचा 'ज्येष्ठ नागरिक संघ' होता कामा नये. संघटनेला दीर्घकाळ भक्कम आधार देणारा स्थिर रचनात्मक पाया देखील आपल्याला येत्या काळात उभा करावा लागेल. सर्वेक्षण आणि संशोधनाची नवीन शास्त्रीय पद्धती संघटनेला विकसित करावी लागेल. संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये विविधांगी साहित्य निर्मितीच्या क्षमता आहेत. ते साहित्य देखील येत्या काळात पुढे आणावे लागेल. इंग्रजी भाषेचा शिक्षण क्षेत्रातील वाढता प्रभाव पाहता ते आव्हान स्वीकारून आपल्याला इंग्रजीतूनही साहित्यनिर्मिती करावी लागेल. अशा असंख्य योजना मनात घेऊन मी चालत आहे. हा प्रवास आपल्या साऱ्यांना एकमेकांसोबतच करायचा आहे. हा रस्ता पानाफुलांचा नाही, तर काट्याकुट्यांचाच आहे. पण हा आपण स्वतः स्वीकारलेला मार्ग आहे. विवेकाच्या आधारे आनंददायी सहजीवन जगणारा समाज आपल्याला हवा आहे. अशा शोषणमुक्त, निर्भय आणि नीतिमान समाज निर्मितीचं स्वप्न आपण सारेच बघत आहोत. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांची प्रेरणा आपली सगळ्यांची ताकद आहे. या ताकदीच्या बळावर आणि विचारांच्या प्रेरणेने हे स्वप्न आपण सारेच पूर्ण करू या!

●

## जादूटोणाविरोधी कायदा देशभरात लागू करण्याचा निर्धार

महाराष्ट्रात सर्वप्रथम लागू झालेला जादूटोणाविरोधी कायदा देशातील इतर दोन राज्यांनी स्वीकारला असून जादूटोणाविरोधी कायदा संपूर्ण देशासाठी लागू व्हावा यासाठी आगामी काळात महाराष्ट्र अंनिसच्या वतीने संघटितपणे प्रयत्न करणार असल्याचा निर्धार राज्य कार्यकारिणी बैठकीच्यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्राने देशाला अनेक पथदर्शी कायदे दिले आहेत. महाराष्ट्र अंनिसच्या पाठपुराव्याने राज्य शासनाने जादूटोणाविरोधी कायदा व सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा मंजूर केला. जादूटोणाविरोधी कायदा महाराष्ट्रानंतर कर्नाटक व गुजरात राज्याने देखील स्वीकारला असून या कायद्याची गरज देशभर असल्याचे अधोरेखित झाले आहे. यामुळे हा कायदा देशाच्या संसदेने देखील पारित करावा यासाठी प्रयत्न, पाठपुरावा व संघटितपणे संघर्ष करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी समारोपप्रसंगी व्यक्त केला.



# अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यातून मानवता वाचवू या!

**मेधा पाटकर** । मुंबई
मो. ९४२३९६५१५३

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शहादा येथे दि. ३०, ३१ मे व १ जून २०२५ रोजी संपन्न झालेल्या विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीत आयोजित लक्षवेधी कार्यकर्ता पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधाताई पाटकर यांच्या भाषणाचा संपादित अंश.**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पस्तीस वर्षपूर्तीनंतरच्या आजच्या या विशेष कार्यक्रमानिमित्ताने विवेकी विचारधारा पुढे घेऊन जाणारे शहीद डॉ नरेंद्र दाभोलकर यांना मी सर्वप्रथम आदरांजली अर्पण करते. शहीद दाभोलकर सरांच्या खूप आठवणी आहेत. नर्मदा बचाव आंदोलनातील उपोषणप्रसंगी आम्हाला साथ देण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अनेक साथींसह ते नाशिकरोडला पोहोचले होते. त्यांचा विवेकशील दृष्टीकोन साधना साप्ताहिकाच्या लेखनातून तर अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या लक्षवेधी कार्यातून उमटलेला दिसून येतो, जो आपण कधीही विसरू शकत नाहीत. त्यांची प्रेरणा घेऊन आज कार्यरत असलेले उर्जावान कार्यकर्ते, मंचावर उपस्थित माधव बावगे सर, डॉ. कुलकर्णी व कुलकर्णीताई आणि उपस्थित सर्वांना जोरदार जिंदाबाद !

आपण श्रद्धा अमान्य करीत नाहीत. श्रद्धा म्हणजे स्वत:शिवाय एखाद्या व्यक्तीवर, धर्मावर, प्राण्यावर, दैवतावर, कुठे निसर्गावर असलेल्या श्रद्धेला आपण कधी नाकारत नाहीत. श्रद्धेचे स्वातंत्र्य आपल्याला संविधानाने दिले आहे. त्यामुळे आपण कोणत्याही व्यक्तीचे स्वातंत्र्य नाकारत नाही. श्रद्धा ह्या आपल्याला प्रेरणा देतात. परंतु विवेक आणि श्रद्धा यातील तफावत म्हणजे अंधश्रद्धा हे ओळखून आपण वागले पाहिजे. आज श्रद्धेच्या नावाखाली लोकांना अंधश्रद्धेकडे घेऊन जाण्याचा घाट घातला जातो आहे. लोकांना अंधश्रद्धांकडे ढकलले जात असल्याचे आपल्याला ठायी ठायी जाणवते आहे. ह्या अंधश्रद्धांविरोधात गेली पस्तीस वर्षे अंधश्रद्धा निर्मूलन समिती कार्य करते आहे. यात हजारो कार्यकर्ते जात-पात, धर्म-पंथ, लिंग-वर्ण, वर्ग-समूह असे भेद मागे टाकून आपण सर्व कार्य करीत आहात; त्यासाठी मी आपणा सर्वांना सलाम करते.

आपण अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामासाठी बांधील राहून वेगवेगळ्या प्रकारच्या कार्याला किती पुढे नेऊ शकू याचे एक आव्हानात्मक वास्तव आपल्यापुढे आज उभे आहे. आज महाराष्ट्र सुद्धा, उत्तर प्रदेशाच्या मार्गाने चालला आहे की काय अशी परिस्थिती अनेक ठिकाणी आढळते. याकडे डोळेझाक करून आपण तटस्थ राहू शकत नाहीत. अशा परिस्थितीत आपण जर समाजवादीच राहिलो, कणखर वृत्ती आणि आत्मविश्वास बाळगला तर सत्तावादी, धनवादी आणि धर्मांध शक्ती यांना आव्हान देऊ शकतो. जनसुरक्षेच्या नावाने जे विधेयक येऊ घातले आहे, ते खरे तर जन-असुरक्षा विधेयक आहे.

अशा परिस्थितीत हरेक प्रकारची अंधश्रद्धा दूर करतांनाच जातिवाद, धर्मांधता, लिंगभेद, प्रांतभेद, सत्तांधता, असमानता यांच्या निर्मूलनासाठीही आपण झटू तितके कमीच असणार आहे. अनेक जातिधर्मपंथ हा भारतीय परंपरेचा भाग राहिलेला असला तरीही या परंपरा 'गंगा-जमनी तहजीब' राहिलेल्या आहेत. आपापल्या धर्मांचे पालन करतांनाही आपण दुसऱ्या धर्माला कधी कमी लेखत नाहीत हीच शिकवण आपण साने गुरूजींच्या 'खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे' या प्रार्थनेतून शिकलो. या प्रार्थनेचा खरा अर्थ छोट्या छोट्या आदिवासी मुलांना समजला आहे. धर्म म्हणजे काय आणि अधर्म म्हणजे काय हे नव्या पिढीच्या मनावर बिंबवणे आवश्यक आहे. वेदोपनिषदे नि सर्व धर्मग्रंथांचा अभ्यास करून मानवधर्म, विवेकधर्म सांगणाऱ्या डॉ दाभोलकरांपासून तर गोविंद पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या धर्मसमभावाला सुद्धा ते (सनातनी प्रवृत्ती) मानू शकत नाहीत. ही अत्यंत क्लेशदायी गोष्ट आहे.

संविधानामध्ये समाजवाद व धर्मनिरपेक्षता ही मूल्ये सुरुवातीपासूनच आहेत, परंतु प्रास्ताविकेत उशिरा का होईना १९७६ मध्ये घटनादुरूस्तीनंतर हे शब्द अंतर्भूत करण्यात आलेत त्यासाठी आम्ही संसदीय लोकशाहीला धन्यवाद देतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सर्वधर्मसमभाव आणि उपासनास्वातंत्र्य हे तर प्रास्ताविकेत

आधीच रेखून ठेवलेले होते. परंतु समाजवाद व धर्मनिरपेक्षता ही मूल्येच काढून टाकण्यासाठी काही जण कोर्टात याचिका दाखल करायला भिडतात; या गोष्टीला काय म्हणावे? या देशाचे स्वातंत्र्य हे सर्वांच्या संघर्षमय त्यागातून उभे राहिलेले आहे. 'चले जाव' चळवळीत युसुफ मेहेर अली यांनी 'भारत छोडो'चा नारा दिला आणि अरूणा असफ अली यांनी तिरंगा फडकवला होता. ऑगस्ट क्रांती मैदानावर हजारो भारतीयांनी 'चले जाव'चा नारा दिला. पण त्याकाळात ज्यांचे स्वातंत्र्य आंदोलनात कुठलेही योगदान नाही, ज्यांनी तिरंग्याला विरोधच केला, तेच आज 'तिरंगा यात्रा' काढत आहेत. या गोष्टीचे स्वागत आहे. परंतु तिरंग्यातील एकेका रंगाचा आज अवमान केला जातो आहे. त्यागाचा रंग केसरी, धरतीचा रंग हिरवा, शांतीचा रंग पांढरा; हे रंग आज पायदळी तर तुडवले जात नाहीत ना? हे पाहणं आवश्यक झालं आहे. आपण या साऱ्या पाखंडाविरूध्द लढण्याचे काम करीत आहात म्हणून मी आपल्याला सलाम करते.

आम्ही 'नफरत छोडो' अशी घोषणा दिली आणि ती 'नफरत छोडो, भारत जोडो' अशी उचलली गेली. मग आम्ही जन-आंदोलनांच्या वतीने 'नफरत छोडो, संविधान बचाओ' अशी घोषणा दिली. असो. आमच्या घोषणांचा चांगल्यासाठी वापर होत असेल तर तक्रारीचे कारण नाही. बुवा-बाबा, धर्मांध लोक तर अंधश्रद्धा पसरवीत असतातच, परंतु जेव्हा राजसत्ताच अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा पसरवीत असतील आणि त्यातून विद्वेष वाढवीत असतील तर त्याविरूध्द बोलले पाहिजे, भूमिका घेतली पाहिजे. आज दलित, आदिवासी तरूणांना दिशाभूल करून कावड यात्रेत ओढले जाते आहे. आईवडिलांना श्रावणबाळाने कावडीने काशीला नेले असे सांगून आजच्या दलित, आदिवासी तरूणांना अयोध्येकडे जाणाऱ्या कावड यात्रेत ओढले जाते आहे. या दलित, आदिवासी तरूणांना कोण सांगेल की, यांच्या आईवडिलांना मुक्ती देण्याचे महान काम डॉ बाबासाहेब आंबेडकरांसारख्यांनी केले आहे. अयोध्या, रामराज्य याविषयीच्या अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात पसरवल्या जात आहेत. 'जंग छेडो, अयोध्या चलो', 'मेरा गांव, मेरी अयोध्या' यासारख्या फसव्या घोषणांमधून तरूणाईला भरकटवण्याचे काम केले जात आहे. या पार्श्वभूमीवर अयोध्येत रामराज्य आहे का याचा शोध घेणे आवश्यक आहे.

बाबरी मशिदीच्या ध्वंसानंतर आम्ही अयोध्येतीलच सर्व धर्मांच्या प्रतिनिधींना घेऊन देशभरात 'देश बचाओ, देश बनाओ' यात्रा काढली होती. या यात्रेचा समारोप फैजाबाद येथे झाला. तिथे सर्व धर्मांचे धर्मगुरू उपस्थित होते. परंतु त्याअगोदर अयोध्येतीलच एकेका मंदिरातील महंतांशी, पुजाऱ्यांशी माझी चर्चा झाली. तेव्हा धक्कादायक वास्तव समजले. ते म्हणाले, ''अरे मॅडम, इधर तो कभी झगडा था ही नहीं. यहाँ तो मुस्लीम बुनकर ही रामनाम के गमछे बुनते हैं. यहाँ हर मुस्लीम के घर में राम और केवट (रामाला शरयूच्या पलीकडील काठावर घेऊन जाणारा नाविक) का फोटो रहता है.'' मी म्हणाले, अरे, ही अशी गोष्ट आहे? हे तर मला माहीतच नाही. मी जाऊन पाहिले, तर एकेका मुस्लीम घरात रामाचा आणि केवटचा फोटो होता. अयोध्या ही एकेकाळी सर्वधर्मसमभावाची प्रतीकनगरी होती. म्हणून इराणच्या राणीने कधी इच्छा व्यक्त केली होती की, मृत्युनंतर अयोध्येतच तिच्या मृतदेहाचे दफन व्हावे. आणि आज तर शवयात्रा काढायची असेल तरी सेनेची परवानगी घ्यावी लागते. हे सर्व त्या लाल गढीच्या महाराजांनी आम्हाला सांगितले होते. त्यानंतर कानूनी आणि मैदानी लढाई आपण पाहतोच आहोत. न्यायाधीशांना सुद्धा कधी संविधान प्रेरणा देते तर कधी देव प्रेरणा देतो, त्यातून ते फैसला देतात हे ऐकून आपल्यालाही धक्का बसतो.

गेल्या डिसेंबरमध्ये मला पुन्हा फैजाबाद येथे जाण्याची संधी मिळाली. अश्फाक उल्लाह, पंडित राम प्रसाद बिस्मिल आणि रोशन सिंह या सर्वांना जिथे फाशी झाली तिथे आम्ही गेलो. तिथे आता कुठलाही कार्यक्रम करू देत नाहीत. पण मला जाऊ दिले. मी तिथे २५ लोकांना घेऊन गेले. फाशीच्या तख्तावर चढून पाहिले नि जे जाणवले मनामध्ये! नंतर अयोध्येची नगरी पाहायला गेले तर जे दिसले ते शब्दात सांगता येणार नाही. चकचकीत मंदिरच नाही तर त्याबरोबर मोठमोठे मॉल उभारण्यासाठी, भव्य रस्ते करण्यासाठी असंख्य लोकांची हजारो घरे बुलडोझरने ध्वस्त केलेली. एकेक जण रडून सांगत होता की, आम्ही बेघर झालो आहोत, मलव्यात आमचे सामान बाहेर पडलेले आहे आणि आम्हाला एक पैसा भरपाई मिळालेली नाही. मी म्हटले, 'पण मग समोर हे इतके मोठे बंगले, इमारती, चमचमते मॉल, हॉटेल्स बांधले जात आहेत ते कोणाचे आहेत?' ती माणसे म्हणाली, हे गुजराथी आणि राजस्थानी लोक आहेत, जे करोडो रुपयांच्या जमिनी खरेदी करीत आहेत. पण आमच्या जमिनी तर ना खरेदी केल्या गेल्यात ना त्यांचे भूसंपादन झाले. बस आलेत आणि आमच्या घरांवर कब्जा करून बुलडोझर चालवलेत. तेव्हा संविधान दिवशीचे आमचे गीत मला आठवले,

घर घर पर बुलडोझर लेकर तुम जब आगे बढते हो
निर्माता को बेघर करके संविधान कुचलते हो
संविधान की हत्या करनेवालों तुम ये जान लो
आत्महत्या के जिम्मेदार तुम्ही को मान लो

छोटे छोटे दुकानदार ज्यांच्या नावे एकेक लाख रुपये दिले गेले होते त्यांच्याकडे नवीन दुकानासाठी ऐंशी ऐंशी लाख मागितले जात होते. तशातच एक परमेश्वर नावाचा तरुण साधू भेटला. माझ्याकडे त्याचा फोटो आहे. त्याला विचारले, 'आप मंदिर में क्यों नहीं रहते?' त्या साधूने अचूक व स्पष्ट सामाजिक, राजकीय, आर्थिक भाष्य करणारे उत्तर दिले, 'हर मंदिर होटल बन गया है, मॅडम. घरबार, परिवार बचपन में ही छोडनेवाले हम वहाँ कैसे रह सकते हैं?' तेवढ्यात दोन लहान मुले येऊन उभी राहिली. काय पाहिजे असे विचारल्यावर एका दुकानाकडे बोट दाखवत म्हणाली, 'ती दोन बिस्किटे पाहिजेत'. कुठे राहतात विचारले तर घाटाकडे बोट दाखवत म्हणाले, 'तिकडे'. तिथे त्यांची आई घाटावरची जागा साफ करीत होती. असं येतं आहे 'रामराज्य'. त्याचे प्रतिबिंब निवडणुकांमध्येही पडले. परंतु आपण समाजवादी असू तर याविषयी प्रश्न उपस्थित करणे आपले कर्तव्य आहे. आपण केवळ निवडणुकीच्या नाही तर आव्हानात्मक राजकारणाच्या विरुद्ध आवाज उठवला पाहिजे.

उत्तराखंडातील चार धामसुध्दा याच प्रकारे उद्ध्वस्त करण्यात येत आहेत. लोकांना श्रद्धाळू बनवायचे आहे. पण श्रद्धा कशावर आहे? सुप्रीम कोर्टाच्या कमिटीच्या प्रतिकूल अहवालानंतरही चार धामला जाणारा असा रस्ता बनवला गेला की, अलकनंदा, मंदाकिनी, भागीरथी अशा गंगेच्या एकेक उपनद्या पाण्याऐवजी गाळानेच भरून गेल्या. उत्तराखंडला खंड- खंड करण्यात येत आहे. जोशीमठच्या परिसरातील रहिवाश्यांना अशाचप्रकारे उद्ध्वस्त केले गेले आहे.

उज्जैनच्या महांकाळला जाणाऱ्यांना माहीत आहे का की, क्षिप्रा नदी किती प्रदूषित झाली आहे? नर्मदेच्या काठावरून आता चालणे अवघड झाले आहे. वाळूच्या अवैध उपशाविरोधात आम्ही खटला जिंकूनही उपसा चालूच आहे. नर्मदा परिक्रमा करणाऱ्यांना देखील माहीत नसते की, नर्मदेचे पाणी पिण्यालायक राहिलेले नाही. मित्रांनो, नदीवर, वृक्षवल्लींवर श्रद्धा असावी. परंतु लोक आज कृत्रिम व्हेंटिलेटरवर बोलतात पण ते या हिरवळीच्या व्हेंटिलेटरवर बोलत नाहीत. पर्यावरणीय बदलांवर, पर्यावरणीय न्यायावरही आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे होतात. पण या चर्चा नि वृक्षांवरची श्रद्धा आपल्याला, तेलंगणाचे असो की बक्षवाहचे असो, ते जंगल आणि पर्यावरण रक्षणाविषयीची प्रेरणा देत नाहीत, हे वास्तव आहे. गडचिरोली, चंद्रपूरमधल्या आदिवासींनी परंपरागत साधेपणाचे, निसर्ग-प्रकृतिला अनुकूल जीवनप्रणाली स्वीकारून निसर्गाचे, जंगलाचे पिढ्यानपिढ्या रक्षण केले, त्यांची संस्कृती नष्ट करण्याचा नागर लोकांना काहीच हक्क नाही. उलट संविधानाने कलम ४८ नुसार आदिवासींच्या संस्कृतीचे रक्षण, संरक्षण आणि प्रसार करण्याचे कर्तव्य राज्यसंस्थेसाठी सांगितले आहे आणि नागरिकांची जबाबदारी सांगितली आहे.

कुंभमेळ्यामध्ये जीवनातून मृत्यूच्या खाईत लोटली जाणारी ही माणसे कोणती श्रद्धा घेऊन येतात, हेच कळत नाही. कदाचित हीच अंधश्रद्धा असेल. खरे तर आपल्या जवळून वाहणारी कोणतीही नदी, मग ती गंगा असो की तापी, गोदावरी असो की, नर्मदा असो तीच आपली माता आहे. कुंभमेळ्यात जाऊन तिथल्या नदीला प्रदूषित करण्यात आणि प्रदूषित पाण्यात डुबकी मारण्यात पुण्य मिळते हीच मोठी अंधश्रद्धा मानायला हवी. याविषयी जागृती करताना अंधश्रद्धांनाच श्रद्धा मानायला लावणाऱ्या यंत्रणांशी आपल्याला लढायचे आहे. जगातील दीड हजार वैज्ञानिकांनी सांगितले आहे की, मानवजातीचे अस्तित्वच धोक्यात येते आहे. ती पूर्णपणे प्राकृतिक जीवनशैलीपासून दूर जाऊन भौतिक सुखाने परावलंबी होते आहे. ही धोक्याची स्थिती आपण ओळखली पाहिजे. तेव्हाच आपण संघटना म्हणून काहीतरी करू शकणार आहोत.

अंधश्रद्धेची आज खूप सारी वेगवेगळी रूपे आपल्यासमोर येत आहेत. जात ही सुध्दा एक अंधश्रद्धा आहे. जी जात नाही ती 'जात', असे बाबा आढाव नेहमी म्हणतात; ते खरेही आहे. महाश्वेतादेवी म्हणतात, वंचित-शोषितांची भागीदारी ज्यात सुनिश्चित आहे, तीच खरी लोकशाही असते. वास्तविक परिस्थिती मात्र वंचित-शोषितांची भागीदारी सुनिश्चित होताना दिसत नाही. अशी भागीदारी सुनिश्चित झाली असती तर आज कोणालाही आरक्षणाची गरज पडली नसती. परंतु जगातील धोरणे समतावादी, न्यायपूर्ण नाहीत. संसाधनांचे योग्य वाटप नाही. 'लुटी कमाई, बढी महंगाई' यानुसार दिवसाला सोळाशे कोटी कमावणारे अब्जाधीश एकीकडे तर शून्य कमाई असणारे आदिवासी दुसरीकडे. या स्थितीला 'विकास' म्हणणे ही एक अंधश्रद्धाच आहे. बिलियन, ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था सर्वांचा विकास करेल हीच मोठी अंधश्रद्धा आहे. ही अर्थव्यवस्था सर्वांचे भले करेल, सर्वांचा विकास करेल, अशा समजुतीतच आज सर्वोच्च बेरोजगारी निर्माण झाली आहे. श्रमिकांना किमान वेतन मिळावे यासाठी आजही कायद्याची आणि रस्त्यावरची लढाई लढावी लागते आहे. ठेकेदारांकडे काम करणारे मजूर आजही अनिश्चिततेत, असुरक्षिततेत आहेत. अर्थव्यवस्थेविषयीच्या या सर्व प्रकारच्या अंधश्रद्धांबद्दल आपल्याला काम करावे लागणार आहे. या आर्थिक अंधश्रद्धा, ज्यात समानता आणि

सामाजिक न्याय हेच आधारस्तंभ आहेत ती समाजवादी व्यवस्थाच संपुष्टात आणत नाहीत तर भारतीय संविधानालाही क्षती पोहोचवत आहेत.

स्वातंत्र्यपूर्वकाळात बिरसा मुंडांचा प्रकृतिधर्म आपल्याला प्रेरणा देत होता. त्यांनी ब्रिटिशांपासून आपल्या जमिनी वाचवल्या. पण आज स्वतंत्र भारतात आपल्या बळकावल्या जाणाऱ्या जमिनी आपण वाचवू शकत नाहीत. जंग जंग लढाई करून आम्ही २०१३ मध्ये जो भूमी अधिग्रहण कायदा मंजूर करून घेतला त्यानुसारही भूअर्जन, भूसंपादन न करता सर्वसामान्यांच्या जमिनींवर थेट कब्जा करून अतिक्रमण होते आहे. जमिनी वाचविण्यासाठी शेतकरी रस्त्यावर येतात तर त्यांच्यावर असा लाठीमार होतो की, त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागते. मुंबईत एखाद्या बिल्डरच्या प्रॉपर्टीकडे जाणारा रस्ता सुंदर दिसावा यासाठी गरिबांकडे सर्व कागदपत्रे असतांनाही त्यांच्या वस्त्या उजाड केल्या जात आहेत. ही घरे वाचविण्यासाठी 'घर बचाओ, घर बनाओ' आंदोलन करावे लागते आहे. अशा परिस्थितीत आज देशात लोकशाही व्यवस्था आहे का? असा प्रश्न पडतो आहे.

रेशन, पेन्शन, भूक असे प्रश्न असतांनाच कृषी व्यापाराच्या धोरणानुसार ते तीन कायदे पुन्हा आणू पाहत आहे. नवीन कायदे येत आहेत, ही सुद्धा अंधश्रद्धाच आहे. कारण हे कायदे लोकतांत्रिक प्रक्रियेने येतात का? ॲड प्रशांत भूषण यांनी सांगितले, कोरोना काळात वीस तासात वीस कायदे बदलले गेले. १४६ खासदारांना संसदेतून निलंबित करून कायदे कसे मंजूर होऊ शकतात? संविधानाच्या चौकटीत मुलभूत अधिकारांच्या बरोबरच मार्गदर्शक तत्त्वांचेही पालन करणे हे शासनाचे कर्तव्य जे म्हटले आहे त्यानुसारच हे कायदे होतात का? लोकसभेत, विधानसभेत लोकांच्या समस्या ठोसपणे सोडवल्या जात नाहीत. म्हणून तर आदिवासींना, सामान्य लोकांना रस्त्यावर यावे लागते, उपोषण करावे लागते. जल, जलसंपदा, प्रकृती, पहाड, नदी, जंगल, जमीन वाचविण्यासाठी आम्हाला का लढावे लागते आहे? आम्ही कोणत्या लोकशाहीवर विश्वास ठेवावा?

केवळ तंत्रज्ञान व विज्ञानाच्या बदलाने परिवर्तन व विकास होऊ शकत नाही हे जाणून राजीव गांधींनी संविधनाची कलमे २४३, २४४ नुसार पंचायतराज कायदा आणला. परंतु त्याचेही पालन होत नाही. आज संविधानाची शपथ घेणारे संविधानावर श्रद्धा ठेवतात काय? तंत्रविज्ञान आणि कायद्यांच्या बदलांवर विश्वास या अंधश्रद्धा झाल्या आहेत म्हणून आपण फसतो आहोत. तर साथींनो, देशात संविधान आहे म्हणून त्यानुसार देश चालतो आहे हे मानून चालणे योग्य होणार नाही. संविधान बदलले नाही याचा अर्थ संविधानाची पायमल्ली होत नाही, असे म्हणता येत नाही. संविधान आहे म्हणून लोकशाही आहे, असे म्हणणे सुद्धा अंधश्रद्धा आहे. यासाठी प्रत्येक युवकाने, वडिलधारी लोकांनी याची चिकित्सा करून असत्याची पोलखोल करणे आवश्यक आहे. तेव्हा आपल्याला संविधान आणि वर्तमान लोकशाही चालवणाऱ्यांच्याप्रति सजग राहणे आवश्यक आहे.

युवकांना वेगवेगळ्या अंधश्रद्धांच्या माध्यमातून भडकावून, भुलवून समाजात तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत. 'कश्मिर फाईल्स' हा चित्रपट पंधरा दिवस दाखवून नंतर रामनवमीच्या मिरवणुका काढल्या जात आहेत. माथी भडकलेले तरूण या मिरवणुकांमध्ये सहभागी होताना दिसत आहेत. अंधश्रद्धांचे कायमस्वरूपी निर्मूलन करण्यात महिलाशक्तीचे योगदान महत्त्वाचे व आवश्यक आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीला सर्व प्रकारच्या अंधश्रद्धा संपविताना लोकसभा, विधानसभेतील राजकीय अंधश्रद्धांनाही आव्हान द्यावे लागणार आहे. लोकसभेहून ग्रामसभा श्रेष्ठ आहे, हे आपण मान्य करून त्याप्रमाणे वागणार नाही तोपर्यंत खरी लोकशाही येणार नाही. आपण साधी जीवनप्रणाली, खेड्यांचे स्वावलंबन, प्रकृतिनिर्भर आदिवासी समुदायांच्या अधिकारांची सुरक्षितता, श्रमिकांचा सन्मान आणि शाश्वत विकास करण्याचे स्वप्न पाहतो आहोत. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेत सुध्दा अशा मुद्द्यांवर लेख येत असतील. शहीद डॉ. दाभोलकर यांनी सुद्धा साने गुरूजींची प्रेरणा घेऊन कामाला सुरूवात केली होती. मी त्यांना, त्यांच्या परिवाराला ओळखते. तुम्ही सर्वांनी एकजूटीने, समन्वयाने पुढे जाण्याची गरज आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आज एक व्यवस्थित संघटनात्मक संरचना पुढे घेऊन जात आहे. शहीद डॉ. दाभोलकर यांची प्रेरणा आपल्यासोबत कायम आहे. आपण 'मोहब्बत की दुकान' न बनवता प्रेमाचा पैगाम, संदेश म्हणून सर्वांपुढे ठेवू या... या अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यातून मानवता हा धर्म आपण सर्वांनी मिळून वाचवू या! भेदभाव मिटवू या, प्राकृतिक आणि सादगीभरी जीवनप्रणाली विकसित करू या. असा मला या प्रसंगी आशावाद वाटतो आहे. मला संवादाची संधी दिली यासाठी आपणा सर्वांना धन्यवाद देते.

**शब्दांकन : डॉ. बाळू दुगडूमवार**

●

परिसंवाद

# संविधानातील मूल्यांमध्ये संत विचारांचेच प्रतिबिंब



**ह. भ. प. श्यामसुंदर महाराज सोन्नर** । वडखेल (बीड)
मो. ९८९२६७३०४७

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शहादा येथे दि. ३१ मे, २०२५ रोजी संपन्न झालेल्या विस्तारित राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत आयोजित 'संत परंपरा : अंधश्रद्धा निर्मूलन ते मानवता धर्म' परिसंवादातील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले ह. भ. प. श्यामसुंदर सोन्नर महाराज यांच्या भाषणाचा संपादित अंश.**

विचारमंचावरील आणि विचारमंचासमोरील सर्व मान्यवर बंधू-भगिनींनो,

महाराष्ट्रात समाजसुधारणेचे कार्य करणाऱ्या वेगवेगळ्या संस्था-संघटनांमध्ये सर्वात मजबूत नि मोठ्या अशा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वेगवेगळ्या पदांवर आज निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे मी अभिनंदन करतो. आम्हाला एकदम ब्रँड ॲम्बॅसॅडर तुम्ही घोषित करून टाकल्यामुळे एक नवी जबाबदारी आमच्यावर आल्यासारखे वाटते आहे. पण तसंही काही नाही. कारण २०१३ पासूनच मी वैयक्तिकरीत्या या संघटनेशी जोडला गेलेलो आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने मागणी केलेल्या कायद्याला काही मूठभर लोकांनी वारकऱ्यांच्या नावाखाली अनेक वर्षे विरोध चालवला होता. ते सर्वच काही वारकरी नव्हते, पण अनेकांना टोपी घालून वारकरी बनवून त्यांच्या नावाने पत्रके काढली जात होती आणि त्या रोखणाऱ्यांमध्ये एक-दोन जे काही खरे वारकरी होते, जे कायद्याला विरोध करण्यासाठी लोकांमध्ये भाषण करायला जायचे त्यांच्यात मी एक होतो. डॉ. दाभोलकर त्यावेळेला यायचे, वेगवेगळ्या लोकांच्या भेटी घ्यायचे. आमचे पत्रकार मित्र मला म्हणायचे, ''महाराज, तुम्ही पत्रकारही आहात, विचारी आहात, विवेकी आहात; असं असताना कायद्याला विरोध का करता? तुम्ही एकदा तरी कायदा समजून घेतला का?''

मी म्हणायचो, ''त्यात काय समजून घ्यायचं? आमच्या धर्माच्या विरोधी असल्यामुळे समजून घ्यायची गरजच नाही.''

ते म्हणायचे, ''इतरांचे ठीक आहे, पण तुम्ही तरी एकदा समजून घ्या.''

मी पत्रकार होतो, राजकीय वृत्तांकन करायचो. त्यानिमित्ताने मुंबईला विधानसभेच्या अधिवेशनात एकदा डॉ. दाभोलकरांची भेट झाली. तिथे डॉक्टरांनी मला विचारले, ''महाराज, तुमचा विरोध काय?''

मी म्हटले, ''आमच्या धर्माच्या विरोधात आहे.''

''कायद्यातील कोणता भाग धर्माच्या विरोधात आहे?'', असे म्हणत डॉक्टरांनीच मला विचारायला सुरुवात केली, ''माझ्यामध्ये विशिष्ट प्रकारची शक्ती आहे, त्या शक्तीने मी तुमचा रोग बरा करतो, याला वारकरी संप्रदायाची मान्यता आहे का?''

मी म्हटले, ''अजिबात नाही. आम्ही तर उलट म्हणतो-

'शेंदरी हेंदरी दैवते, कोण तीं पूजी भूतेकेते?
आपुल्या पोटा जी रडते, मागती शिते अवदान।'

असा कुठलाही देव कोणाचे रोग बरे करीत नाही, असे वारकरी संप्रदाय म्हणतो.''

मग डॉक्टरांनी पुढचा प्रश्न टाकला, ''माझ्यामध्ये विशिष्ट प्रकारची शक्ती आहे आणि मी मागच्या जन्मामध्ये कृष्ण होतो, तू मागच्या जन्मामध्ये राधा होतीस, अशा बहाण्याने जर एखादा भोंदू एखाद्या व्यक्तीचे शोषण करीत असेल, तर त्याला वारकरी संप्रदायाची मान्यता आहे का?''

मी म्हटलं, ''अजिबात नाही.'' त्यांना तुकाराम महाराजांच्या पुढील अभंगाचा दाखलाच दिला,

'ऐसे कैसे जाले भोंदू, कर्म करोनि म्हणती साधु,
अंगा लावूनिया राख, डोळे झाकुनि करिती पाप,
दावुनि वैराग्याची कळा, भोगी विषयाचा सोहळा,
तुका म्हणे सांगो किती, जळो तयांची संगती'

डॉक्टर म्हणाले, ''मग हेच तर अंधश्रद्धा निर्मूलन

कायद्यात आहे.''

मग त्यांनी कायद्याचे एकेक कलम नि अनुच्छेद सांगायचा आणि मी त्यासंबंधित अभंग म्हणायचा, असे बराच वेळ सुरू राहिले. त्या दिवशी कायदा, त्यातील कलमे मला पटल्यानंतर अधिवेशन संपल्याबरोबर जी काही कायद्याला विरोध करणारी माझ्यासारखी विचारी प्रमुख मंडळी होती; परंतु केवळ आपल्या धर्माच्या विरोधात आहे अशा गैरसमजुतीने कायद्याचा मसुदा न वाचताच जी मंडळी विरोध करीत होती, अशा सर्वांच्या मी भेटी घेतल्या. अंधश्रद्धा निर्मूलन कायदा हा वारकरी संतांनी या महाराष्ट्रात ज्या विचारांची पेरणी केली, ज्या विचारांचा जागर केला, संतांच्या त्याच विचारांवर आधारित आहे, अशा प्रकारे सर्वांना पटवून दिले. तेव्हा दोन्ही बाजूंच्या सहमतीने मसुदा अंतिम झाला. तो मसुदा पुढच्याच अधिवेशनात मंजूर करण्याचे आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय पृथ्वीराज चव्हाण यांनी दिले होते. तशी अनुकूल परिस्थितीही निर्माण झाली होती. परंतु त्याआधीच डॉक्टरांवर प्राणघातक हल्ला झाला आणि त्यात ते शहीद झाले. तेव्हापासून माझ्या मनाला इतकी बोचणी लागली की, आज जी भूमिका मी घेतलेली आहे तीच जर पाच, सात, दहा वर्षांपूर्वी घेतली असती आणि त्याचवेळी जर हा कायदा मंजूर झाला असता तर कदाचित डॉक्टर आज हयात असते. आपण ठोस भूमिका घेण्यात दिरंगाई केल्यामुळे डॉक्टरांना जीव गमवावा लागला अशी बोचणी मनाला लागून राहिलेली आहे. त्यावेळेसच ठरवले की, जेव्हा जेव्हा संघटनेला गरज पडेल, त्या प्रत्येक वेळी, जे जे शक्य होईल ते करण्यासाठी या संघटनेबरोबर उभे राहायचे. २०१३ पासूनच तुम्ही हाक मारली तेव्हा तेव्हा मी तुमच्याबरोबर आलेलो आहे. कारण, जे काम संतांनी केलंय तेच काम महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पुढे नेते आहे; याची मला खात्री झाली आहे.

महाराष्ट्र अंनिसच्या मंचावर मी पहिल्यांदा आलो त्यावेळी मला खूप ट्रोल केलं गेलं आणि आता आम्हाला ट्रोलिंगची सवयच झाली आहे. ह. भ. प. ज्ञानेश्वर बंडगर महाराजांनी गेल्या वर्षी 'कोपले ट्रोलर्स हे सनातनी लोक, आता मज भीक, कोण घाली' अशा शीर्षकाचा एक लेखच लिहिला होता. डॉ. दाभोलकरांनी ते सहन केलंय, इतरही प्रत्येक सुधारणावादी माणसाने सहन केलंय. इथे महात्मा गांधींना जेवढ्या लाखोली वाहिल्या जातात तेवढ्या कोणालाच नाहीत. मग त्या तुलनेत आपल्याला खूप कमी शिव्या मिळतात, असं समजून आम्ही हे आता स्वीकारलेलं आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती संतांचेच कार्य करीत आहे. म्हणून तीन वर्षांपूर्वी ज्यावेळी आपल्या संघटनेने सगळ्या संतांच्या स्थळी भेटी देत प्रबोधन यात्रा काढली होती त्या यात्रेच्या प्रारंभी आणि समारोपात सुद्धा मला सहभागी होता आलं, त्याचा आनंद आहे. ज्या वर्षी डॉ. दाभोलकरांचा जिथे खून झाला त्या स्थळी त्याच्या पुढील वर्षी मी माझ्या मुंबईच्या सहकाऱ्यांसह कीर्तनाला गेलो होतो तेव्हा समितीचे कार्यकर्ते ज्या आपुलकीने आमच्याशी वागत होते ते अनुभवून एक महाराज नंतर म्हणाले, ''आपण स्वतःला संतांच्या विचारांचे म्हणवतो, आपल्या कृतीतून किमान पुण्यप्राप्तीचा तरी स्वार्थ असतो. अहो, पण ही माणसे आपली एवढी काळजी घेत आहेत, सामाजिक कार्य करीत आहेत, यांना तर पुण्याचीही अपेक्षा नाही. कुठल्याही अपेक्षेशिवाय, एखादं निष्काम कर्म करण्याची जी अध्यात्मातील सर्वोच्च पातळी असते ती खऱ्या अर्थाने अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्त्यांनी गाठली आहे.'' वारकरी संतांनी मुळातच ज्या कार्यासाठी चळवळ सुरू केली तेच कार्य आज तुम्ही करीत आहात.

बाराव्या शतकातील कालखंडात संपूर्ण समाज जात, धर्म, पंथ, वर्ण यात विभाजित झालेला, अंधश्रद्धेच्या अधीन, विविध कर्मकांडांमध्ये अडकलेला होता. विविध समाजघटकांमध्ये दुफळी निर्माण करण्याचे आज ज्याप्रकारे प्रयत्न होत आहेत, तशीच स्थिती त्यावेळच्या समाजव्यवस्थेने निर्माण केलेली होती. परिणामी, असा समाज दुर्बळ बनतो आणि म्हणून बाराव्या शतकाच्या दरम्यान भारतावर जास्त परकीय आक्रमणे झालेली दिसतात. त्याच दरम्यान वारकरी संप्रदायातील संतांनी सामाजिक समतेसाठी प्रयत्न केलेले दिसून येतात. महाराष्ट्रात चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथाच्या माध्यमातून, कर्नाटकात बसवेश्वरांनी लिंगायत पंथाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू केले होते. महाराष्ट्र अंनिस मध्यममार्गी व समतेची भूमिका घेत ज्याप्रमाणे आज कार्य करते आहे, तशीच भूमिका वारकरी संप्रदायातील संतांनी घेत समाजपरिवर्तनाची प्रक्रिया सुरू केली होती. पंढरपूरच्या वाळवंटामध्ये वेगवेगळ्या जातीतल्या संतांना एकत्र आणण्यात संतश्रेष्ठ नामदेव महाराज अग्रभागी राहिले. सर्व जातिधर्मांच्या लोकांना

एकत्र आणणाऱ्या वारकरी संप्रदायाची समतेची चळवळ उभी राहिली. म्हणून वारकरी चळवळ कुठल्याही एका जातीची, धर्माची, पंथाची, प्रांताची नाही; किंवा कुठल्या एका पक्षाच्या दावणीलासुद्धा बांधली गेलेली नाही. मात्र आज हीच समतेची वारकरी चळवळ विशिष्ट राजकीय पक्षाच्या दावणीला बांधण्याचे कारस्थान सुरू आहे. गेल्या काही निवडणुकांच्या दरम्यान आमच्या काही पूजनीय, वंदनीय म्हटल्या जाणाऱ्या महाराजांच्या कीर्तनाच्या व्हिडिओ क्लिप पाहिल्या तर वारकरी संप्रदायाचा मूळ समतेचा विचार आणि या वंदनीय म्हणवल्या जाणाऱ्या या महाराजांचे विषमतेचे विषारी विचार हे परस्परविरुद्ध आहेत. असे महाराज हे वारकरी संप्रदायाचे वारसदार असूच शकत नाहीत. ज्या वेळेला माझं संविधानावर व्याख्यान असतं तेव्हा वारकरी संप्रदाय एकाच धर्माचा, पंथाचा कसा नाही यावर मी सविस्तररीत्या मांडणी करीत असतो. त्यावर मी आता बोलणार नाही.

वारकरी संप्रदायाने सामाजिक सुधारणेची, परिवर्तनाची भूमिका घेतली त्या कालखंडाच्या अगोदर कीर्तन करण्याचा अधिकार हा फक्त विशिष्ट समाजघटकाला, वर्गाला होता. महाराष्ट्रात सध्या चार कीर्तन परंपरा आहेत. सर्वात जुनी नारदीय कीर्तन परंपरा आहे. त्यानंतर वारकरी कीर्तन परंपरा, रामदासी कीर्तन परंपरा आणि सत्यपाल महाराज (सप्त खंजिरीवादक) स्वीकारतात ती एक परंपरा. सत्यपाल महाराजांनी जे 'पाल' नावाने आपले कीर्तनकार अनुयायी तयार केले, ते खूप चांगले प्रभावी कार्य करताहेत. ही चौथी कीर्तन परंपरा सत्यपाल महाराजांची आहे. त्याकाळी कीर्तनकार मध्यभागी आणि त्याच्या डाव्या बाजूला पेटीवाला व उजव्या बाजूला तबलेवाला असायचा. जे काही सांगायचे ते एकट्या कीर्तनकाराने सांगायचं आणि कीर्तन संपल्यानंतर सर्वांनी त्या एकाच्याच पाया पडायचं अशी एकाधिकारशाहीची भक्ती परंपरा होती. नामदेव महाराजांनी पहिलं काम केलं की, कीर्तनकाराच्या दोन्ही बाजूंना पाच पंचवीस टाळकरी आणि कीर्तन करत असताना कीर्तनकार जो विषय मांडतो आहे त्या विषयाला अनुरूप प्रमाण देण्याचा अधिकार सर्व टाळकऱ्यांना दिला. तसेच कीर्तन कोणत्याही जातिधर्माची व्यक्ती करू शकते, अशा प्रकारची भूमिका अमलात आणली. तेव्हापासूनच वारकरी संप्रदायामध्ये कीर्तन करण्याचा, भक्ती करण्याचा अधिकार सर्वांनाच मिळाला आहे. कीर्तनानंतर कीर्तनकारासह सर्वच एकमेकांच्या पाया पडतात. नामदेव महाराज एका ठिकाणी म्हणतात, 'ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चांडाळाही अधिकार'. चार वर्णांबाहेरील चांडाळालासुद्धा वारकरी संप्रदायात कीर्तनाचा अधिकार आहे. नव्हे, नव्हे; 'बाळे, नारी, नर, आदि करुनी वेश्याही'. वेश्येलासुद्धा नुसता अधिकार नाही तर वेश्येलाही संतपद देण्याची समानता दाखवली ती वारकरी चळवळीनेच. ज्या काळात महिलांना कुठल्याही प्रकारे बोलण्याचा, मत मांडण्याचा किंवा सर्वच अधिकार नाकारले जात होते, त्याकाळात आमच्या वारकरी परंपरेने जनाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा अशा काही वेगवेगळ्या समाजघटकांतून आलेल्या महिलांना संतपद बहाल केले. आपल्या संघटनेच्या सुधारणावादी, परिवर्तनवादी, समतेच्या विचारांचा, अंधश्रद्धा निर्मूलनाचा वारसा मांडायचा तर असा नऊशे वर्षांपूर्वीचा आहे. आजही बऱ्याच ठिकाणी विचारलं जातं की, पाच दिवस महिलेने घरामध्ये राहावं की नाही? तिने स्वयंपाक करावा की नाही? तिने मंदिरात जावं की नाही? पण सातशे वर्षांपूर्वी गावकुसाबाहेर राहणाऱ्या एक संत सोयराबाई विचारतात, 'अरे, आम्हा महिलांना विटाळच नसता तर तुमचा जन्म तरी कुठून झाला असता?' इतका पुरोगामी, तर्कशुद्ध विचार त्याकाळी एका महिलेने मांडावा ही किती धार्ष्ट्याची गोष्ट होती! आज इथे माझ्या बऱ्याच माताभगिनी बिनापदराच्या बसलेल्या दिसतात. परंतु त्याकाळी जनाबाई म्हणतात,

'डोईचा पदर आला खांद्यावरी,
भरल्या बाजारीं जाईन मी
हातीं घेईन टाळ, खांद्यावरी वीणा
आतां मज मना कोण करी ।'

सातशे वर्षांपूर्वी आमच्या जनाबाईंनी पदरापेक्षा आज आपण ज्याला मानवाधिकार म्हणतो ती मानवाधिकाराची भूमिका घेत या परिवर्तनवादी विचारांचा आपला माणूस म्हणून असलेला वारसा बजावला आहे.

२०१५ मध्ये मराठवाड्यात भीषण दुष्काळ पडला होता. नदीत, तळ्यात, बारवात कुठेही पाणी नव्हते. पाणी होतं ते फक्त शेतकऱ्यांच्या डोळ्यात. लातूरला तर रेल्वेने पाणी आणलं जात होतं. लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होतो तेव्हा तिथे जे दिसले ते माझ्या पुढील काव्यातून व्यक्त झाले,

उजाड राने उदास चेहरे, डोळ्यात दाटले पाणी
अन् श्रावणात मग कशाची सांगा पाऊसगाणी
श्रावणमासी हर्ष मानसी होतच नाही मुळी आता
हिरवळ शोधून कुठे दिसेना झाड बोडके सांगे व्यथा
आभाळाकडे लावून नजरा डोळे पुरते थकून गेले
अन् मातीच्या गर्भात पेरले कोंब कोवळे सुकून गेले
जनावरांचे पोट खपाटी गाईचा तर आटला पान्हा
दुधासाठी टाहो फोडीत झोपाळ्यात भुकेला तान्हा
आश्वासनांच्या वांझ ढगांची रोज नव्याने होते दाटी
ऊर फुटला, धीर सुटला मृगजळाच्या धावुनी पाठी
वर्षा ऋतू सरून गेला, वर्षावाचून सुकली शेते
'वर्षा'मध्ये मुख्यमंत्र्याला झोप तरी हो कशी येते?'

लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना मी प्रश्न केला, ''कोकणात, गडचिरोलीला पूर आलेत. मात्र आपल्या लातूरलाच का रेल्वेने पाणी आणावं लागलं?'' तेव्हा जिल्हाधिकारी साहेबांनी सांगितलं, ''पर्यावरणाचा, पावसाचा समतोल राखायचा असेल तर वनक्षेत्र हे किमान ३३ टक्के असले पाहिजे आणि लातूर जिल्ह्यातील वनक्षेत्र आहे ०.७ टक्के.'' श्यामसुंदर महाराजांवर विश्वास ठेवायची गरज नाही. तुम्ही लोक महाराजांवर आंधळा विश्वास ठेवता म्हणून 'आमचं' बरं चाललंय. परंतु गुगलवर तुम्हाला ही माहिती मिळू शकते. घरासाठी, कारखान्यांसाठी, देखण्या फर्निचरसाठी, यज्ञयागासाठी बेसुमार लाकूडतोड झाली. धर्मशास्त्रात सांगितले आहे की, यज्ञात हत्तीच्या सोंडेएवढी साजूक तुपाची धार लावावी. यज्ञयाग अशा कर्मकांडांच्या माध्यमातून समाजाचे, निसर्गाचे शोषण व्हायचे. एवढे तूप जर आपण जाळायला लागलो, वनसंपदा नष्ट करू लागलो तर आपले संसार नीट राहतील का? तरीही पाऊस पडेना म्हणून कर्मकांडांच्या हितसंबंधियांकडून आजही यज्ञ करण्याचे खूळ माजवले जाते आहे. म्हणून मी म्हणतो, पाऊस न पडण्याच्या कारणांमध्ये यज्ञयागाची कर्मकांडे हे देखील एक कारण आहे. वैदिक परंपरेने यज्ञयागाचे स्तोम माजवले असताना आमच्या ज्ञानेश्वर महाराजांनी मात्र सांगितलं,

'योग याग विधी येणें नव्हे सिद्धि'
वायाचि उपाधि दंभ धर्म ।'

अशा उपदेशांतून वारकरी संतांनी एका अर्थाने अंधश्रद्धा निर्मूलनाचीच चळवळ उभी केलेली दिसून येते. तरीही उत्तरेकडचा कोणी बागेश्वर येतो आणि 'तुकाराम महाराज की लुगाई उन्हे डंडे से पीटती थी' अशा औद्धत्यपूर्ण वक्तव्याची हिंमत करतो आणि यातील वाईट बाब अशी की, तरी सुद्धा आजच्या एकाही वारकऱ्याच्या तोंडून निषेधाचा साधा ब्र शब्द निघाला नाही. पण साहित्यिक आनंद यादव यांच्या दहा वर्षांपूर्वी लिहिलेल्या कादंबरीतील दोन शब्दांसाठी त्यांच्या घरासमोर आंदोलन करून त्यांची साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली निवड रद्द करण्यात हेच लोक पुढे होते. 'ज्ञानेश्वर - तुकाराम महाराजांपेक्षा मनू श्रेष्ठ आहे', असं जेव्हा तो सांगलीचा 'गुरुजी' म्हणतो तेव्हाही यांच्या तोंडाला कुलूप लागते. अशा वेळेला हे खरोखर वारकरी आहेत का, अशा प्रकारची मनामध्ये शंका निर्माण होते. बागेश्वरच्या मनात तुकाराम महाराजांविषयी का राग आहे? कारण तो पर्ची काढतो आणि तुकाराम महाराज तर म्हणतात,

'सांगो जाणती शकून, भूत भविष्य वर्तमान
त्यांचा आम्हासी कंटाळा, पाहो नावडती डोळा'

पर्ची काढणाऱ्याचं तोंडही पाहू नका म्हणतात. मग त्याला तुकाराम महाराजांचा राग येऊन त्यांची बदनामी नाही का करणार? खरेतर एकेकाळी वारकरी संतांनी समतेची, विवेकाची पताका उत्तर भारतात नेऊन रोवलेली आहे. वारकरी संत नामदेव महाराज हे समतेचा, स्वातंत्र्याचा, बंधुत्वाचा, सामाजिक न्यायाचा, नव्हे अंधश्रद्धा निर्मूलनाचा विवेकी विचार घेऊन पहिल्यांदा संपूर्ण उत्तर भारतात व नंतर पंजाबमध्ये गेले. पंजाबमध्ये ते काही काळ राहिले आणि तिथे नामदेव महाराज, त्यांनी सांगितलेले विवेकी विचार अतिशय लोकप्रिय झाले. आज मात्र येथील राजकारणी उत्तर भारतातील कुडमुड्या कथाकारांना आणून, त्यांचे मोठमोठे इव्हेंट करून त्यांचे विषमतेचे, अविवेकी विचार आमच्या माथी मारताहेत. हे कथाकार इथल्या आमच्या मराठी समाजाला अंधश्रद्धांच्या अंधकारात बुडवत आहेत. कारण समाज जर शिकला, सुधारला, विवेकी झाला तर तो राजकारण्यांच्या मागे जाणार नाही. म्हणून हा समाज दुबळा, दैववादी, भयग्रस्त, अडाणी कसा राहील यासाठी आजकाल असे प्रतिगामी प्रयत्न केले जात आहेत. म्हणून संतांनी मांडलेली पुरोगामी भूमिका प्रखरतेने मांडण्याचे कर्तव्य आपल्याला याकाळात पार पाडावे लागणार आहे.

मी तरी संविधानावरील कीर्तनाला कसा प्रारंभ केला? मुंबईमध्ये एका वर्तमानपत्राचा राजकीय संपादक म्हणून मंत्रालयाकडे काम करीत होतो. त्यादरम्यान

समजले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान हे हिंदू धर्माविरुद्ध केलेलं कारस्थान आहे, असं हे तथाकथित महाराज कीर्तनांमधून सांगू लागले आहेत. त्याच काळात दिल्लीमध्ये संविधानाची प्रत जाहीरपणे जाळली गेली. त्या घटनेच्या क्लिप आमच्या तोंडावर फेकल्या गेल्या. आणि त्याच दरम्यान तोच 'गुरुजी' नाशिकला येऊन सांगत होता की, 'संविधानापेक्षा मनुस्मृती श्रेष्ठ आहे'. हे एकाच वेळी कसे नियोजनपूर्वक घडून येत होते. म्हणून त्याचवेळी मी ठरवलं की, संविधानाला कीर्तनातून बदनाम करणाऱ्यांना उत्तर द्यायचे तर संविधान हे संतविचारांवरच कसे आधारित आहे हे कीर्तनातूनच सांगणे आपले कर्तव्य आहे. आणि म्हणून 'संविधान आणि संतचळवळ' यावरची गेल्या पाच वर्षांमध्ये १८८ कीर्तने मी केलेली आहेत. संविधानातील मूल्यांमध्ये संतविचारांचेच प्रतिबिंब उमटले आहे; हे समाजापुढे मांडावे लागेल.

संजय बनसोडे सर म्हणाले की, 'महाराज, तुमच्यासारख्या कीर्तनकारांची संख्या वाढली पाहिजे. आमच्यासारख्यांची संख्या किती वाढेल हे माहीत नाही. पण मी म्हणतो, तुमच्यातीलच दहा जण आमच्यासोबत या. ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर आणि मी जबाबदारी घेतो की, या दहा जणांना प्रशिक्षण देऊन एक महिन्याच्या आत कीर्तनकार म्हणून तयार करतो. मला सांगायला आनंद वाटेल, अशाच प्रकारच्या प्रयत्नांतून ह. भ. प. डॉ. बालाजी महाराज जाधव हे कीर्तनकार तयार झालेले आहेत. आज शिव, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांनी फुललेल्या महाराष्ट्राला ज्या व्यवस्थेच्या माध्यमातून इथल्या माणसाला माणूसपण नाकारलेलं होतं त्याच स्थितीमध्ये पुन्हा एकदा समाजाला घेऊन जाण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अशा वेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि वारकरी संतविचारांचे पाईक यांनी मिळून अशा शक्ती रोखण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

जय हिंद! जय महाराष्ट्र!

**शब्दांकन : प्रल्हाद मिस्त्री**

●

## समारोप सत्र

महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात वारकरी संप्रदाय व सत्यशोधक चळवळीनंतर अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ संत-समाजसुधारकांचे विचार समर्थपणे समाजात रुजवीत आहे', असे प्रतिपादन वारकरी चळवळीतील कीर्तनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांनी विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीच्या समारोप सत्रात केले. राज्य प्रधान सचिव डॉ. ठकसेन गोराणे, गजेंद्र सुरकार, रुक्साना मुल्ला, विजय परब, राज्य सरचिटणीस आरती नाईक, सुरेश बोरसे, कृष्णात कोरे, सुधाकर काशीद, विलास निंबोरकर, शहाजी भोसले, उत्तरेश्वर बिराजदार, शहादा शाखेचे अध्यक्ष डॉ. बी. डी. पटेल, जिल्हा कार्याध्यक्ष वसंत वळवी, जिल्हा प्रधानसचिव रायसिंग पाडवी, मुकेश कापुरे, आदी उपस्थित होते.

नवनिर्वाचित राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी बैठकीच्या समारोपप्रसंगी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना म्हटले की, आगामी काळात संघटना अधिक सक्षमपणे, जोमाने व शिस्तीने समाजातील अंधश्रद्धांचे उच्चाटन करण्यासाठी त्याचबरोबर भारतीय संविधानाचा मूल्य आशय व समाजसुधारकांचा वारसा रुजविण्यासाठी काम करीत राहील. महाराष्ट्र अंनिस ही जात, धर्म, पंथ, लिंग निरपेक्ष चळवळ आहे. कोणत्याही प्रकारच्या विषमतेला या चळवळीत थारा नाही.

'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची चळवळ ही समाजासाठी दिशादर्शक असून तिची व्यापक परिवर्तनवादी चळवळींच्या इतिहासात निश्चितपणे दखल घेतली जाईल', असे प्रतिपादन राज्य उपाध्यक्ष संतोष आंबेकर यांनी केले. दुसरे राज्य उपाध्यक्ष संजय शेंडे म्हणाले की, 'अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार घेऊन तन-मन-धनाने काम करणारे कार्यकर्ते हे येणाऱ्या पिढीला नवी प्रेरणा व ऊर्जा देणारे आहेत.'

समारोप प्रसंगी नंदुरबार जिल्ह्याच्या कार्यकर्त्यांनी राज्य कार्यकारिणी बैठकीचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल सर्वांचे सत्कार करण्यात आले. सूत्रसंचालन राज्य प्रधान सचिव विनायक सावळे यांनी केले.

# महा. अंनिस संतांचीच वैचारिक वारसदार



**ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर ।** घेरडी (सोलापूर)
मो. ८४५९२१२०२५

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शहादा येथे दि. ३१ मे, २०२५ रोजी संपन्न झालेल्या विस्तारित राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत आयोजित 'संत परंपरा : अंधश्रद्धा निर्मूलन ते मानवता धर्म' परिसंवादातील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले ह. भ. प. ज्ञानेश्वर बंडगर महाराज यांच्या भाषणाचा संपादित अंश.**

नमस्कार,

आज आपण महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीच्या निमित्ताने एकत्र आलेलो आहोत. त्यात सर्व नागरिकांसाठी खुला असा 'संतपरंपरा - अंधश्रद्धा निर्मूलन ते मानवता धर्म' या विषयावर संवाद करत आहोत. त्यावर ह. भ. प. श्यामसुंदर सोन्नर महाराजांची अत्यंत प्रभावी मांडणी झालेली आहे. महाराजांची आपल्याला पत्रकार आणि कीर्तनकार म्हणूनच ओळख होती. परंतु आज त्यांची कवी म्हणूनही नव्याने ओळख झाली आहे. वास्तविक पाहता, कवी आणि कविता ही संतांचीच परंपरा आहे. महाकवी नामदेव ढसाळ हे पूर्वपरंपरेमधील दोन कवींना मानतात. त्यात पहिले कवी अर्थातच तुकोबाराय आणि दुसरे नाव आपल्याला आश्चर्य वाटेल, याच खानदेशी मातीचा गंध लाभलेल्या महान कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे आहे. लौकिक अर्थाने अशिक्षित असूनही बहिणाबाईंनी आपल्या आशयगर्भ काव्यातून जे जीवनाचे तत्त्वज्ञान मांडले आहे ते अत्यंत विवेकपूर्ण आणि महत्त्वाचे आहे. सोपानदेव चौधरींनी आपल्या आईंचे म्हणजेच बहिणाबाईंचे काव्य जेव्हा आचार्य अत्रेंना दाखवले तेव्हा ते वाचून अत्रे सोपानदेवांना म्हणाले, 'सोपानराव, तुम्ही गंभीर गुन्हा केलाय. महाराष्ट्रापासून हे अस्सल बावनकशी सोनं तुम्ही इतके दिवस लपवून ठेवलंय.' त्यानंतरच हे अक्षरसाहित्य महाराष्ट्राला ज्ञात झाले. या बहिणाबाईंवर वारकरी संप्रदायाचा प्रभाव होताच. त्यांनी पांडुरंग हा श्रमिकांचा देव आहे असं सांगितलं. पांडुरंग आणि इतर देव यांच्यातला फरक सांगताना त्या म्हणतात–

'सोन्यारुप्यानं मढला, मारवाड्याचा बालाजी।
शेतकऱ्याचा इठोबा, पानाफुलामधी राजी ।।'

असा फक्त प्रेमाने आणि सहजपणे प्रसन्न होणारा हा वारकरी संप्रदायाचा विठ्ठल आहे. बहिणाबाईंवर वारकरी संतांचा मोठा प्रभाव आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या स्थापनेला ३५ वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने आळंदीला जे अधिवेशन झालं होतं, त्यात आपण पाहिलं की, अंधश्रद्धा निर्मूलन समिती ज्ञानेश्वर माऊलींचा, संतांचाच वारसा चालवीत आहे. त्यामुळेच हे अधिवेशन आळंदीमध्ये घेऊन ज्ञानेश्वर माउलींना अभिवादन केले होते. जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथे मुक्ताई माऊलींची समाधी आहे. आता मुक्ताईंना अभिवादन करण्यासाठी आपण खानदेशाच्या मातीमध्ये जमलेलो आहोत. बहिणाबाईंना या भावंडांची थोरवी माहीत होती. त्या काळच्या सनातनी ट्रोलर्सनी ज्ञानदेवादि भावंडांना कसे छळले त्याचा समाचार बहिणाबाई आपल्या काव्यातून घेतात,

'अरे संन्याशाची पोरं,
कोन बोलती हिनई
टाकीदेयेल पोरांचं, कधी
तोंड पाहू नही'

तेव्हा ज्ञानदेव समाजावर रुसले आणि त्यांनी एका झोपडीमध्ये स्वत:ला कोंडून घेतले. ज्ञानदेवांना संतत्वाची जाणीव करून देणारा उपदेश ताटीच्या अभंगांतून मुक्ताई माऊलीने केला. अशी ताटीच्या अभंगांची ही पार्श्वभूमी इतर कीर्तनकारही सांगतात. परंतु पुढे ज्ञानदेवांच्या मनात काय मंथन घडले ते बहिणाबाई आपल्या प्रतिभेने जाणून मांडतात, ते असे–

'उबगले ग्यानदेव, घडे असंगाशी संग।
कयवयली मुक्ताई, बोले ताटीचे अभंग।।
घेती हिरीदाचा ठाव, ऐका ताटीचे अभंग।
एका एका अभंगात, उभा केला पांडुरंग ।।

गह्वरले ज्ञानदेव डोये गेले भरीसन।
असा भाग्यवंत भाऊ त्याची मुक्ताई बहीण।।'

मुक्ताई माऊलींनी वारकरी संप्रदायाच्या विचारांचा एका अर्थाने पाया घातला असं म्हणता येईल. मुक्ताईंच्या या ताटीच्या अभंगांतला एक अभंग मी तुम्हाला सांगतो.

'वरी भगवा झाला नामे। अंतरी वश केला कामे।।
त्याला म्हणू नये साधू। जगी विटंबना बाधू ।।'

भगवे वस्त्र त्यागाचे प्रतीक आहे. भगवे वस्त्र लेऊन लोक नावापुरते भगवे होतात, वैराग्य धारण केल्याचे सोंग करतात. परंतु आतून मात्र वासनाग्रस्त असतात. मुक्ताई म्हणतात, अशा नावापुरते भगवे ल्यालेल्या व्यक्तीला साधू म्हणू नये. कारण त्याने जगाला फसविण्यासाठी भगवे वस्त्र नेसलेले असते. जगात त्याची अंतिमतः छी: थू: होते. तुकोबाराय देखील म्हणतात,

'भगवे तरी श्वान सहज वेष त्याचा ।
तेथे अनुभवाचा काय पंथ ।।
वाढवूनी जटा फिरे दाही दिशा।
तरी जंबुवेषा सहज स्थिती।।'

तरीही लोक बाह्यखुणांना भुलतात. त्याचे कारण लोक अज्ञान, अंधश्रद्धा आणि लोभादि मानसिक विकारांनी ग्रस्त असतात. अशा विकारांनी ग्रस्त असलेले लोकच अशा फसव्या आधाराला बळी पडतात. अशी फसवणूक का आणि कशी होते ते ज्ञानदेव सांगतात,

'तापत्रयी तापले, गुरुते गिर्वासती
भगवे देखोनि म्हणती, तारा स्वामी
तव ते नेणोनि, उपदेशाची रीती
आनान उपदेशिती ठकले
निश्चिती तैसे झाले ।'

संसारातील विविध ताणतणावांनी त्रस्त लोक तारणहार गुरूच्या शोधात निघतात आणि एखाद्या भगव्या वेशातील व्यक्तीला पाहून म्हणतात, 'स्वामी, आमचे या तापातून तारण करा.' तो स्वामी त्यांचे तारण तर करू शकत नाहीच; परंतु अशा लोकांची स्वामीने केलेल्या उफराट्या उपदेशांनी फसवणूक मात्र होते. संतांनी आध्यात्मिक क्षेत्रातील भोंदू बाबाबुवांकडून होणाऱ्या फसवणुकीपासून सामान्य जनांना सावध केलेले आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकरसुद्धा त्यांच्या भाषणांमधून आध्यात्मिक क्षेत्रातील भोंदू बुवांवर टीका करायचे. परंतु अशा वेळी भोळेभाबडे लोक शेवटी म्हणतात, 'आमचे गुरू, बाबा, महाराज, बापू, अण्णा तसे नाहीत हो.' नंतर मात्र दोन-चार वर्षांनी त्यांचा बाबा पहिल्या बाबापेक्षाही भयंकर असल्याचे उघड होते. वरील अभंगातच मुक्ताई पुढे म्हणतात,

'आपआपणा शोधून घ्यावें । विवेक नांदे त्याच्या सवें।।
आशा, दंभ अवघे आवरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।'

विवेकपूर्ण विचारांनी आपण स्वतःच स्वतःला शोधावे, आत्मपरीक्षण करावे. विवेकाने सर्व चिकित्सा करावी. स्वतःच्या अशा शोधातून चांगल्या-वाईटातील फरक दाखविणाऱ्या विवेकी विचारांचा लाभ होतो. विवेकी विचारांचा लाभ झाला की, आपल्यातील रागलोभादि दोष दूर होतात. असा तर्कशुद्ध उपदेश या ताटीच्या अभंगांतून मुक्ताई यांनी केलेला आहे. या एकाच अभंगातून महाराष्ट्र अंनिसच्या पंचसूत्रीतील चार सूत्रांचा आशय व्यक्त झाला आहे. १) फसवणूक करणाऱ्या अंधश्रद्धांपासून दूर राहा. २) वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगा. ३) धर्माची विधायक व कठोर चिकित्सा करा. ४) संत व समाजसुधारकांचा वारसा जपा. याच ताटीच्या अभंगांचे महत्त्व बहिणाबाईंनी आपल्या काव्यातून सांगितले आहे की, 'एका एका अभंगात उभा केला पांडुरंग'. असे ताटीचे २७ अभंग आहेत. इथूनच जवळ त्र्यंबकेश्वरला याच ज्ञानेश्वरादि भावंडांपैकी निवृत्तीनाथांची समाधी आहे. निवृत्तीनाथांनी सांगितलं आहे,

'अहंता खंडावी, समता वर्तावी ।'

अहंकाराचे खंडन करा तरच तुमच्याकडून समतेने वर्तन होईल, समतेचा व्यवहार होईल. पौष महिन्यामध्ये त्र्यंबकेश्वरला निवृत्तीनाथांची यात्रा भरते. वारकऱ्यांच्या दिंड्या जशा देवाच्या क्षेत्राला जातात तशा संतांच्या क्षेत्रालासुद्धा जातात. हे थंडीचे दिवस असतात. बहिणाबाई चौधरी यांनी वारकऱ्यांचे वर्णन केले आहे,

'आरे वारकऱ्या, तुले नही ऊन, वारा, थंडी
झुगारत अवघ्याले, आली पंढरीची दिंडी'

ऊन, वारा, पाऊस या सगळ्याला झुगारत वारकऱ्यांच्या समता दिंड्या जशा पंढरपूरला जातात तशाच त्र्यंबकेश्वरला निवृत्तीनाथांच्या समाधीस्थळी देखील जातात. त्या काळी दिंड्यांचा मुक्काम नाशिकला गोदावरीच्या घाटावर असायचा. मुक्कामाच्या ठिकाणी कीर्तन व्हायचे. घाटावरील मुक्कामात जेव्हा वारकरी कीर्तनकार तुकोबारायांच्या अभंगांवर निरूपण करायला उभा राहायचा तेव्हा कर्मकांडविरोधी कीर्तनाचे वावडे

असणारी त्या घाटावरची पुरोहित, भटजी मंडळी हातामध्ये शेणाचे गोळे घेऊन त्या कीर्तनकारांवर फेकायची. हा दरवर्षीचा शिरस्ताच होता. त्यामुळे त्या घाटाचं नाव पडलं, 'शेणमारीचा घाट'. आजही नाशिकला गेलात आणि नाशिककरांना शेणमारीचा घाट विचारला तर ते शेणमारीचा घाट दाखवतात. ही गोष्ट वारकरी संप्रदायातले मोठे अधिकारी सत्पुरुष भाऊसाहेब महाराज बार्शीकरांना कळली. ते एकदा नाशिकला येऊन गोदावरीच्या शेणमारीच्या घाटावर कीर्तनाला उभे राहिले. कीर्तनासाठी तुकोबारायांचा कर्मकांडविरोधातला अभंग निवडला. सगळी पुरोहित, भटजी मंडळी हातामध्ये शेण घेऊन उभी राहिली. पण भाऊसाहेब महाराज बार्शीकर संतांच्या अभंगांच्या पुराव्यांबरोबर वेदोपनिषदातलेही कर्मकांडविरोधी पुरावे देऊ लागले आणि वेदोपनिषदे तर पुरोहित, भटजी मंडळीचे प्रतिष्ठित ग्रंथ. त्यामुळे त्यांना विरोधही करता येईना आणि सहनही होईना अशी स्थिती निर्माण झाली. नंतर पुरोहित, भटजी मंडळी भाऊसाहेब महाराजांकडे आली आणि म्हणू लागली, 'शास्त्रात् रुढिर्बलीयसी'. शास्त्रापेक्षाही रूढी अधिक प्रबळ असते. त्यामुळे रुढीनुसार तुम्हाला आमच्या नाशिकच्या गोदावरी घाटावर श्राद्ध, पिंडदान, मुंडन करूनच जावे लागेल. कर्मकांडविरोधी कीर्तन करणाऱ्या भाऊसाहेब महाराजांपुढे पुरोहित, भटजी मंडळीने कर्मकांड करण्याचा पेच उभा केला. भाऊसाहेब महाराज म्हणाले, 'तुमच्या मुलीच्या लग्नात तुमच्या जावयाचे पण श्राद्ध, पिंडदान, करून मुंडन करता का?' पुरोहित, भटजी मंडळी म्हणाली, 'अहो, लग्न हा सोहळा आहे, शुभ सोहळ्यात मुंडन म्हणजे अपशकुन'. मग भाऊसाहेब महाराज बार्शीकर म्हणाले, 'तुमच्यासाठी लग्न हा जसा सोहळा आहे तसा आमच्यासाठी दिंडीने संताच्या क्षेत्री जाणं हा देखील शुभ सोहळा आहे, त्यात आम्ही श्राद्ध, पिंडदान, मुंडन करणार नाही'. दिंडी त्र्यंबकेश्वरहून माघारी येताना पुन्हा या पुरोहित मंडळींनी भाऊसाहेब महाराजांना गाठले आणि म्हटले, 'आता सोहळा संपला; आता श्राद्ध, पिंडदान, मुंडन सर्व कर्मकांड करा.' आजूबाजूचे वारकरी म्हणाले, 'श्राद्ध पिंडदान मेलेल्या माणसाचं करतात, जिवंत माणसाचं नाही. आमच्या संतांना आम्ही आमचे पूर्वज मानतो.'

'तुम्ही संत मायबाप कृपावंत।
काय मी पतित कीर्ती वानूं।।'

आमचे मायबाप संत जरी देहरूपाने नसले तरी विचाररूपाने जिवंत आहेत. त्यामुळे आम्ही श्राद्ध पिंडदान करणार नाहीत, असा हा वारकरी संप्रदायाचा वारसा आहे. हे तात्त्विक भान वारकरी संप्रदायामध्ये जागरूक होतं; आजही आहे. जसा आळंदी 'पुरोगामित्वाचा वारसा जपणारी माती' म्हणून आपण आळंदीत संमेलन घेतले होते. तसाच पुरोगामित्वाचा वारसा या खानदेशातील मातीलासुद्धा आहे. वक्त्याने जाईल त्या भागातल्या लोकांच्या आस्था, श्रद्धा, धारणा लक्षात घेऊन थोडंसं बोलावं असा संकेत आहे. ज्योतिषाच्या विरोधात जसा तुकोबारायांचा अभंग आहे,

'सांगो जाणती शकून, भूत, भविष्य, वर्तमान
त्यांचा आम्हांसी कंटाळा, पाहो नावडती डोळा'

एकनाथ महाराजांचे देखील ज्योतिषांचं सगळं पितळ उघड पडणारे अभंग आहेत. बहिणाबाईंचीसुद्धा ज्योतिषाला नकार देणारी एक कविता आहे.

'नको नको रे जोतिषा, नको हात माझा पाहू
माझं दैव माले कये, माझ्या दारी नको येऊ।'

बहिणाबाईंसारख्या रानामळ्यात राबणाऱ्या कष्टकरी स्त्रीला सुचणारे हे शहाणपण आताच्या 'शिकलेल्या अशिक्षितांना' आजही उमगत नाही. बहिणाबाईंना ते कळलेलं होतं. कारण बहिणाबाईंवर वारकरी संप्रदायाचा प्रभाव होता. त्यांच्या एवढ्या सगळ्या ज्या कविता मी सांगितल्या त्यातील अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार वारकरी परंपरेतून आलेला दिसतो. त्यांच्या कवितांमधून आणखी एक तत्त्व स्रवते, ते आहे 'मानवता धर्म'. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते भालचंद्र नेमाडे यांच्या मते मराठी साहित्यविश्व समृद्ध करणाऱ्या कविता म्हणून बहिणाबाई यांच्या कवितांना एक विशेष स्थान आहे.

'मानसा मानसा, कधी व्हशीन मानूस
लोभासाठी झाला मानसाचा रे कानूस!'

त्या कानूस (माणूसपणाला पारखा) झालेल्या माणसाला माणूस बनविण्यासाठी, विवेकी बनविण्यासाठी ही सगळी संतांची परंपरा आहे. माणसाला जातिधर्माच्या, स्त्री-पुरुष भेदाच्या ज्या ज्या काही विषमतेच्या कृत्रिम गोष्टी चिकटलेल्या आहेत त्या सगळ्या बाजूला सारून माणसाला माणूस बनविण्याचा विचार वारकरी परंपरेने दिलेला आहे. म्हणून मानवता धर्माचेच सार बहिणाबाईंच्या कवितेमध्ये आलेले आहे. संतपरंपरेपासून अंधश्रद्धा निर्मूलन ते मानवता धर्म अशी ही सगळी परंपरा

आहे. चक्रधर स्वामींनीसुद्धा हेच मानवतेचे सूत्र सांगितलेले आहे, 'तुम्ही मनुष्य मात्र होऊनी असावे'. माणसाने केवळ माणूस बनून राहावे, अन्य कोणतेही भेद स्वतःला चिकटवून घेऊ नयेत. माणसाने कुठलेही भेद, उपाधी सगळ्या बाजूला सारून फक्त माणूस म्हणून जगावे. माणूस म्हणून अधिक सुंदर कसं जगता येईल याकरताच संतांचा आणि समाजसुधारकांचा वारसा आहे.

या देशातील मूळ परंपरा या श्रमण धर्मांच्या परंपरा आहेत. त्या श्रमण परंपरांतूनच अनेक तत्त्वे वारकरी संप्रदायाने आणि एकूणच देशभरातल्या भक्तीपरंपरांनी स्वीकारली. महानुभाव असतील, लिंगायत किंवा कबीरपंथी असतील, या सर्वांच्यानंतर हा सगळा समतेचा पुरोगामी वारसा समाजसुधारकांनी पुढे नेला आहे. समाजसुधारकांच्यानंतर तो वारसा अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ जोपासते आहे. त्या अर्थाने ही चळवळ संत आणि समाजसुधारकांची वैचारिक वारसदार आहे आणि त्या चळवळीचे कार्यकर्ते म्हणून आपल्यासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. ह. भ. प. सोन्नर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्रात संतांचा आणि समाजसुधारकांचा वारसा सांगणाऱ्या ज्या काही चळवळी सगळ्या जातिधर्मांत आहेत त्यात जिवंतपणाने, मजबुतीने उभ्या असलेल्या महाराष्ट्रामधल्या अनेक पुरोगामी चळवळी आहेत. परंतु त्यांच्या क्षमता किंवा मर्यादांमुळे काही चळवळी जातींच्या आवर्तनामध्ये अडकलेल्या होत्या. पण सगळ्या जातिधर्मात आणि महाराष्ट्राच्या सगळ्या प्रांतांमध्ये असलेल्या चळवळींमध्ये जर जिवंत लोकचळवळ कुठली असेल तर ती महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही आहे. या लोकचळवळीने हा संतांचा आणि समाजसुधारकांचा वारसा खऱ्या अर्थाने जपलेला आहे. तोच जपत पुढे नेण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. संतांचा पुरोगामी वारसा मी माझ्या 'होय होय वारकरी' या पुस्तकातून मांडलेला आहे. याबाबत अधिक जाणून घेणाऱ्या जिज्ञासूंसाठी या पुस्तकाची दुसरी आवृत्ती उपलब्ध झाली आहे.

'संतपरंपरा : अंधश्रद्धा निर्मूलन ते मानवता धर्म' अशा महत्त्वाच्या विषयावर बोलण्यासाठी आदरणीय माधव बावगे सरांनी मला बोलावलं यासाठी त्यांचे आभार मानतो. त्याचबरोबर संजय बनसोडे सरांची राज्याचे कार्याध्यक्ष पदावर निवड झाल्याचं कळलं, इतरही सगळ्या ज्या राज्य पदाधिकाऱ्यांच्या निवडी झाल्या त्या सगळ्यांना मी शुभेच्छा देतो, त्यांचे अभिनंदन करतो. आपण सगळ्यांनी शांतपणे संतांविषयीचा हा संवाद ऐकला, त्याबद्दल आपल्या सगळ्यांचे मनापासून आभार मानून थांबतो.

('होय होय वारकरी' पुस्तकासाठी
संपर्क : ८४५९२१२०२५)

**शब्दांकन : राजेंद्र फेगडे**

●

## कृतज्ञतेचा भावपूर्ण संदेश

काही वर्षांपूर्वी माझ्या पत्नीच्या मनचे गावी (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) आमच्या कुटुंबावर जातपंचायतीने सामाजिक बहिष्कार टाकला होता. त्या काळात आम्ही खूप त्रास सहन केला, पण मी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला आणि न्याय मिळवण्यासाठी लढा दिला. या लढ्यात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे, जातपंचायत मूठमाती विभागाचे कार्यवाह कृष्णा चांदगुडे व नंदकिशोर तळाशिलकर यांनी मला मनःपूर्वक साथ दिली. त्यांच्या पाठिंब्यामुळेच आम्ही ती लढाई यशस्वीरीत्या जिंकू शकलो. जे लोक आमच्या सुखदुःखात सहभागी होत नव्हते, तेही आता आमच्या पाठीशी उभे राहिले आहेत, हे पाहून मन खूप भरून आले. यावर्षी, पाच वर्षांनंतर मी बकरी ईदनिमित्त पुन्हा गावी गेलो आणि तेव्हा मला एक अविस्मरणीय क्षण अनुभवायला मिळाला. तीच जातपंचायत, ज्यांनी कधी काळी आम्हाला बहिष्कृत केलं होतं, आज तीच मंडळी आमच्या घरी येऊन सण साजरा करत होती, आपुलकीने सामील होत होती. हे दृश्य पाहून डोळ्यांत आनंदाश्रू आले. या परिवर्तनामागे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे योगदान खूप मोठे आहे. त्यांच्या सामाजिक कार्यामुळे समाजात विचारांची क्रांती घडत आहे. अंनिसचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. मनापासून धन्यवाद!

**रफिक युसुफ भाटकर**, कांदिवली (पूर्व), मुंबई

# संजय बनसोडे : संघटनेच्या मुशीतून घडलेले नेतृत्व



**प्रा. परेश शाह ।** शिंदखेडा (जि. धुळे)
मो. ९४२१४६५८६४

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य कार्याध्यक्षपदी साथी संजय बनसोडे (इस्लामपूर, जि. सांगली) यांची एकमताने निवड करण्यात आली. महाराष्ट्र अंनिसचे ते चौथे कार्याध्यक्ष आहेत. शहादा (जि. नंदुरबार) येथे दि. ३०, ३१ मे व १ जून, २०२५ रोजी झालेल्या विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीत निवड सहमती समितीने टाळ्यांच्या गजरात कार्याध्यक्ष म्हणून त्यांच्या नावाची घोषणा केली. वरवर बघता ही सामान्य व रुटीन घटना वाटत असली तरी महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीत महत्त्वाचा वाटा असलेल्या आणि देशपातळीवर आपल्या कामाचा अमीट ठसा उमटवलेल्या महाराष्ट्र अंनिससारख्या संघटनेच्या सर्वोच्च पदी निवड होऊन नेतृत्वाची संधी मिळणे हा प्रवास समजून घेण्यासाठी महाराष्ट्र अंनिसची निवडप्रक्रिया, कार्याध्यक्ष पदावरील पूर्वसुरींचे योगदान आणि संजय बनसोडे सरांचे संघटनेचा सामान्य कार्यकर्ता ते कार्याध्यक्ष या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचविणारे कार्यकर्तृत्व हे समजून घ्यायला हवे. त्याचा हा लेखाजोखा.




### लोकशाही निवडप्रक्रिया

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाची त्रिस्तरीय रचना आहे. शाखा, जिल्हा व राज्यपातळीवर हे काम चालते. या तीनही पातळींवर लोकशाही निवड प्रक्रियेतूनच कार्यकारिणी निवडली जाते. डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी घालून दिलेल्या संघटनात्मक शिस्तीनुसार गेली ३५ वर्षे ही निवड प्रक्रिया अत्यंत पारदर्शकपणे पार पडते. राज्यपातळीवर तीन वर्षांसाठी कार्यकारिणी निवडली जाते. त्यासाठी संघटनेतील प्रमुख पदांवर काम केलेल्या व यापुढे कोणतेही जबाबदारीचे पद घेणार नसलेल्या ज्येष्ठ सदस्यांची 'निवड सहमती समिती' गठित केली जाते. विविध पदांसाठी इच्छुक उमेदवारांनी स्वेच्छा फॉर्म भरून निवड सहमती समितीकडे पाठवायचा असतो. त्याचसोबत राज्यभरातील कार्यकर्ते शिफारशी व नकारात्मक मते फॉर्म भरून कळवू शकतात. एक व्यक्ती-एक पद हे तत्त्व काटेकोरपणे अवलंबिले जाते. साधारण महिनाभर ही प्रक्रिया चालते. आलेल्या सर्व स्वेच्छा, शिफारशी व नकार यांची छाननी करून योग्य उमेदवारांची निवड केली जाते. हा निर्णय मान्य नसल्यास निवडणूक लढविण्याचा पर्याय उपलब्ध असतो. पण गेल्या ३५ वर्षांत कोणीही निवडणूक लढविण्याचा पर्याय वापरलेला नाही, ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. कारण संघटनेतील पद हे कोणत्याही प्रकारे सत्तेचे, अधिकाराचे वा लाभाचे नसून ते जबाबदारीचे आहे ही जाणीव संघटनेत विकसित झाली आहे.

शहादा येथील विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीला संतविचारांवरील एका परिसंवादासाठी ह.भ.प. श्यामसुंदर सोन्नर महाराज व ह.भ.प.ज्ञानेश्वर बंडगर महाराज उपस्थित होते. या दोन्ही त्रयस्थ मान्यवरांनी जाहीर मनोगतात नोंदविलेले निरीक्षण निवड प्रक्रियेचे वैशिष्ट्य अधोरेखित करणारे आहे. मा.सोन्नर महाराज म्हणाले, ''एवढ्या मोठ्या संघटनेची निवडणूक इतक्या सहजतेने व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडते हे

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती राज्य कार्यकारिणी

(जून २०२५ - मे २०२८)

### अध्यक्ष



**माधव बावगे**
लातूर

### उपाध्यक्ष



**डॉ. प्रदीप पाटकर**
रायगड



**उत्तम कांबळे**
नाशिक



**प्रा. शामराव पाटील (अण्णा)**
सांगली



**संजय शेंडे**
नागपूर

### उपाध्यक्ष



**डॉ. रश्मी बोरीकर**
छ. संभाजीनगर



**अशोक बेलखोडे**
नांदेड



**संतोष आंबेकर**
बुलढाणा

### कार्याध्यक्ष



**संजय बनसोडे**
सांगली

### राज्य प्रधान सचिव



**गजेंद्र सुरकार**
वर्धा



**डॉ. ठकसेन गोराणे**
नाशिक



**विनायक सावळे**
नंदुरबार



**रूकसाना मुल्ला**
लातूर



**विजय परब**
मुंबई

### राज्य सरचिटणीस



**शहाजी भोसले**
छ. संभाजीनगर



**सुधाकर काशीद**
सोलापूर



**कृष्णात कोरे**
कोल्हापूर



**आरती नाईक**
पनवेल



**विलास निंबोरकर**
गडचिरोली

# विविध विभागाचे राज्य कार्यवाह व सहकार्यवाह

## राज्य सरचिटणीस



**प्रा. सुरेश बोरसे**
धुळे



**उत्तरेश्वर बिराजदार**
लातूर

## विविध उपक्रम विभाग

राज्य कार्यवाह



**अनिल दरेकर**
लातूर

## प्रशिक्षण व्यवस्थापन विभाग

राज्य कार्यवाह



**कीर्तीवर्धन तायडे**
नंदुरबार

सहकार्यवाह



**डॉ. माधुरी झाडे**
वर्धा

## बुवाबाजी विरुद्ध संघर्ष विभाग

राज्य कार्यवाह



**ॲड. रंजना गवांदे**
अ.नगर

सहकार्यवाह



**विष्णूदास लोणारे**
भंडारा

## वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प विभाग

राज्य कार्यवाह



**प्रा. दिगंबर कट्यारे**
जळगाव

सहकार्यवाह



**पी. एम. जाधव**
चंद्रपूर

सहकार्यवाह



**प्रकाश कांबळे**
वर्धा

सहकार्यवाह



**रवींद्र पाटील**
नंदुरबार

## युवा सहभाग विभाग

राज्य कार्यवाह



**प्रियांका खेडेकर**
रायगड

सहकार्यवाह



**हरी आवळे**
कोल्हापूर

## सांस्कृतिक अभिव्यक्ती विभाग

राज्य कार्यवाह



**अनिल करवीर**
पालघर

सहकार्यवाह



**सचिन गोवळकर**
रत्नागिरी

## विज्ञानबोध वाहिनी विभाग

राज्य कार्यवाह



**भास्कर सदाकळे**
सांगली

सहकार्यवाह



**बाबा हलकुडे**
लातूर

## महिला सहभाग विभाग

राज्य कार्यवाह



**गायत्री आडे**
अमरावती

सहकार्यवाह



**रुपेश शोभा**
मुंबई

## मिश्र विवाह विभाग

राज्य कार्यवाह



**रणजित आचार्य**
लातूर

## सर्वेक्षण व संशोधन विभाग

राज्य कार्यवाह



**डॉ. बालाजी कोंपलवार**
नांदेड

सहकार्यवाह



**डॉ. हरीश पेटकर**
वर्धा

## संविधान जागर विभाग

राज्य कार्यवाह



**ॲड. परिक्रमा खोत**
पुणे

### विवेक जागर प्रकाशन व वितरण विभाग

राज्य कार्यवाह



**प्रा. मच्छिन्द्रनाथ मुंडे**
नवी मुंबई

सहकार्यवाह



**तुकाराम शिंदे**
धाराशिव

### निधी व्यवस्थापन विभाग

राज्य कार्यवाह



**प्रा. परेश शाह**
धुळे

सहकार्यवाह



**सुधीर निंबाळकर**
ठाणे

### दस्तऐवज संकलन विभाग

राज्य कार्यवाह



**अशोक निकम**
नवी मुंबई

सहकार्यवाह



**डॉ. सुरेश बिऱ्हाडे**
धुळे

### कायदेविषयक व्यवस्थापन विभाग

राज्य कार्यवाह



**ॲड. मनीषा महाजन**
पुणे

सहकार्यवाह



**ॲड. तृप्ती पाटील**
ठाणे

सहकार्यवाह



**ॲड. गोविंद पाटील**
सोलापूर

### विवेक वाहिनी विभाग

राज्य कार्यवाह



**डॉ. सविता शेटे**
बीड

सहकार्यवाह



**डॉ. विठ्ठलराव घुले**
परभणी

सहकार्यवाह



**संतोष जेठीथोर**
कोल्हापूर

### जोडीदाराची विवेकी निवड विभाग

राज्य कार्यवाह



**रेश्मा खाडे**
कोल्हापूर

सहकार्यवाह



**कविता मते**
नागपूर

### राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समन्वय विभाग

राज्य कार्यवाह



**डॉ. सुदेश घोडेराव**
नाशिक

### जातपंचायतीला मूठमाती अभियान विभाग

राज्य कार्यवाह



**कृष्णा चांदगुडे**
नाशिक

### सोशल मीडिया व्यवस्थापन विभाग

राज्य कार्यवाह



**मनोज बोरसे**
धुळे

## अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका संपादक मंडळ

संपादक



**डॉ. नितीन शिंदे**
सांगली

कार्यकारी संपादक



**उत्तम जोगदंड**
ठाणे

सहसंपादक



**डॉ. श्यामसुंदर मिरजकर**
सांगली

व्यवस्थापकीय संपादक



**अजय भालकर**
सांगली

## संपादक मंडळ सदस्य


**डॉ. बाळू दुगडूमवार**
नांदेड


**प्रल्हाद मिस्त्री**
नाशिक


**राजेंद्र फेगडे**
नाशिक


**हंसराज महाले**
नंदुरबार

## व्यवस्थापकीय सदस्य


**आरबाज पटेल**
सांगली

## सल्लागार


**किशोर बेडकिहाळ**
सातारा

## मानसिक आरोग्य व्यवस्थापन विभाग

राज्य कार्यवाह


**डॉ. प्रदीप जोशी**
जळगाव

राज्य कार्यवाह


**डॉ. अनिल डोंगरे**
रायगड

सहकार्यवाह


**अतुल बडवे**
जालना

सहकार्यवाह


**विश्वजित चौधरी**
जळगाव

## व्यसन : प्रबोधन आणि संघर्ष विभाग

राज्य कार्यवाह


**सारिका डेहनकर**
वर्धा

सहकार्यवाह


**सुधाकर तट**
बीड

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे निमंत्रित


**अविनाश पाटील**
धुळे


**कॉ. बाबा आरगडे**
अ.नगर


**उल्हास ठाकूर**
रायगड


**नितीनकुमार राऊत**
रायगड


**हरिदास तम्मेवार**
लातूर


**सुशिला मुंडे**
नवी मुंबई


**दिलीप आरळीकर**
लातूर


**नंदकिशोर तळाशिलकर**
मुंबई

कौतुकास्पद व अचंबित करणारे आहे. नाहीतर अन्यत्र अशा निवडणुकींसाठी मोठा पोलीस बंदोबस्त व फौजफाटा तैनात करावा लागतो.'' तर मा.बंडगर महाराज म्हणाले, ''महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने जात, धर्म, पंथ, लिंग व प्रदेश निरपेक्ष तीनच मोठ्या चळवळी झाल्या. त्यातील पहिली वारकरी संप्रदाय, दुसरी-सत्यशोधक समाज आणि तिसरी व सांप्रतच्या काळात अस्तित्वात असलेली चळवळ म्हणजे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती.''

या संदर्भात आणखी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करतो. संघटनांतर्गत व समाजातील सर्वांना नेमकेपणाने व थोडक्यात स्पष्टता येण्यासाठी ते आवश्यक आहे. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य करणाऱ्या आता तीन संघटना आहेत. पण या पद्धतीची लोकशाही निवडप्रक्रिया फक्त आणि फक्त शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या अधिकृत संघटनेमध्येच अस्तित्वात आहे. या संघटनेच्या स्थापनेआधी अ.भा.अंनिस या प्रा. शाम मानवप्रणित संघटनेपासून जी फारकत झाली, त्यातील एक प्रमुख तात्त्विक मुद्दा लोकशाही कार्यपद्धतीचाच होता. आताच्या टप्प्यावर २०१९ साली संघटनेचे अध्यक्ष दिवंगत आदरणीय एन.डी.पाटील सरांच्या उपस्थितीत भोर (जि. पुणे) येथील विस्तारित बैठकीत एकमताने राज्य कार्यकारिणी निवड झाली होती. असे असून देखील ट्रस्ट व कुटुंबीय गटाने वारसाहक्क आणि मालकीहक्क दाखवित, प्रलोभन व भीतीचा मार्ग अवलंबून कोरोना काळात २०२०-२१ मध्ये संघटना फोडण्याचा अश्लाघ्य प्रकार केला. सर्व संसाधने व निधी हिरावून घेतले. खरे तर संघटनेच्या शिस्तीनुसार २०२२ ला लोकशाही निवडप्रक्रियेला सामोरे जात त्यांना हव्या त्या पदांवर निवडून येता आले असते. मात्र संघटनेच्या या शिस्तीला धुडकावून त्यांनी वेगळी चूल मांडली. पण महाराष्ट्र भरातील बहुसंख्य क्रियाशील कार्यकर्त्यांनी संघटनेसोबत राहून अवघ्या तीन-चार वर्षांत निर्धाराने शून्यातून तेवढ्याच ताकदीची संघटना पुन्हा उभी केली. म्हणूनच आपण संविधानाची ७५ वर्षपूर्ती व संघटनेच्या ३५ वर्षपूर्तीनिमित्त संविधानावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषद आणि संघटनेचे दोन दिवसांचे राज्य अधिवेशन अत्यंत दिमाखदारपणे आळंदी येथे घेऊ शकलो. आज त्याच संघटनेची २०१९ नंतरची ही दुसरी त्रैवार्षिक निवडणूक तेवढ्याच लोकशाही शिस्तीत यशस्वीरीत्या पार पडली याचा सर्वांनाच आनंद आहे.

**वेगवेगळ्या परिस्थितीतील वैशिष्ट्यपूर्ण निवडी**

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर हे महाराष्ट्र अंनिसचे संस्थापक कार्याध्यक्ष होते. समितीच्या स्थापनेपासून २०१० पर्यंत डॉक्टरांनी संघटनेचे नेतृत्व केले. त्यांच्या एवढा कुशल व कल्पक संघटक, विचारवंत, लेखक व वक्ता संघटनेच्या नेतृत्वपदी होता ही खूप मोठी जमेची बाजू राहिली. संघटनेची वैचारिक व संघटनात्मक जडणघडण व वाढविस्तार करण्यात डॉक्टरांचीच प्रमुख भूमिका राहिली. कार्याध्यक्ष पद सोडण्याच्या तीन वर्षे आधीच डॉक्टरांनी 'मी यापुढे कार्याध्यक्ष पदावर राहणार नाही', हे घोषित केले होते. एवढ्या मोठ्या संघटनेच्या नेतृत्वाचे इतक्या सहजतेने हस्तांतरण होणे ही महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळींच्या इतिहासातील अपवादात्मक घटना होती. त्याचे संघटनेच्या अंतर्गत व बाहेरही जोरदार स्वागत झाले आणि वयाच्या अवघ्या ४०व्या वर्षी २०१० साली अविनाश पाटील यांच्याकडे संघटनेचे कार्याध्यक्ष पद आले. अविनाश पाटील डॉक्टरांच्या खांद्याला खांदा लावून संघटनेच्या कामासाठी महाराष्ट्रभर फिरले होते. संपूर्ण महाराष्ट्रभर संघटनेत, समविचारी संस्था-संघटनांत, शासन-प्रशासनात त्यांचा परिचय होता. भविष्यवेधी दृष्टीकोन होता. अविनाशभाईंच्याच कल्पनेतून संघटनेत विकेंद्रित कार्यपद्धती आणि सामूहिक नेतृत्वाची कल्पना विकसित होत गेली. २०१३ साली डॉ. दाभोलकरांचा निर्घृण खून झाला. अशा आकस्मिक प्रसंगी अविनाश पाटील यांनी संघटना अत्यंत समर्थपणे सांभाळली, पुढे नेली. संघटना एकसंघ ठेवण्यासोबतच वाढविस्तार केला. याच कार्यकाळात पुढे संघटनांतर्गत ताणतणाव वाढले. फुटीर गट बाहेर पडला. पण बहुतांश कार्यकर्ते व शाखा संघटनेच्या बाजूने राखण्यात यश आले. पण या सगळ्या परिस्थितीत ऐनवेळी अविनाश पाटील यांनी कार्याध्यक्षपदाचा राजीनामा दिला. तो एकमताने पुढील २०२२ च्या नवीन कार्यकारिणी निवडीपर्यंत स्थगित ठेवण्यात आला. मात्र अविनाश पाटील कामापासून अलिप्त राहिले.

या नंतर २०२२ मध्ये त्रैवार्षिक कालावधीसाठी राज्य कार्यकारिणी निवड प्रक्रिया पार पडली. त्याच्या दीड-दोन वर्षे आधीच फुटीच्या अत्यंत आव्हानात्मक आणि ताणतणावाच्या परिस्थितीतून संघटना नुकतीच सावरत होती आणि लगेचच अविनाश पाटील यांनी

राजीनामा दिल्याने पुन्हा एकदा संघटनेत अस्थिर वातावरण तयार होण्याची भीती होती. अशा संवेदनशील पार्श्वभूमीवर ही निवडणूक होत होती. या आव्हानात्मक परिस्थितीत कार्याध्यक्ष पदासाठी मा. माधव बावगे हे एक आश्वासक व सर्वमान्य नाव होते. सरांची वयोज्येष्ठता, संपूर्ण महाराष्ट्रभर संघटनेत असलेला संपर्क, संचार व मान्यता, समविचारींसोबतचा संवाद व सर्वांना घेऊन चालण्याची कार्यपद्धती हे महत्त्वाचे होते. खरे तर बावगेसरांनी यापूर्वीच कोणतेही पद घेणार नसल्याचे जाहीर केलेले असून देखील संघटनेच्या या अटीतटीच्या वेळी व अडचणीच्या प्रसंगी सर्वांच्या आग्रहास्तव एक टर्म (त्रैवार्षिक कालावधी २०२२-२५) नेतृत्वाची धुरा स्वीकारण्याची तयारी बावगेसरांनी दर्शवली व एकमताने बावगेसर संघटनेचे कार्याध्यक्ष झाले. सर्वांचा विश्वास सार्थ ठरवीत तरुणांना लाजवेल अशा क्षमतेने सतत पायाला भिंगरी लावल्यागत सरांनी महाराष्ट्रभर दौरे केले आणि संघटनेला सर्व अर्थाने स्थैर्य प्राप्त करून दिले. दरम्यानच्या काळात संघटनेच्या स्थापनेपासून अध्यक्ष असलेल्या आदरणीय प्रा. डॉ. एन. डी. पाटील सरांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ठिकाणी अविनाश पाटील यांच्या संघटनेतील दीर्घकालीन योगदानाबद्दलची कृतज्ञता म्हणून त्यांना अध्यक्षपदासाठी कार्यकर्त्यांनी शिफारशी केल्या. त्यामुळे अविनाश पाटील यांची महाराष्ट्र अंनिसच्या अध्यक्ष या सन्मान्यपदी निवड झाली.

**आधीच्या तीनही कार्याध्यक्षांसोबत काम**

संघटनेच्या स्थापनेपासूनच्या वरील तीनही कार्याध्यक्षांसोबत जवळून काम करण्याची संधी संजय सरांना मिळाली. डॉ. दाभोलकर हयात असतानाच २००७ ते २०१० या काळात ते राज्य सरचिटणीस होऊन दुसऱ्या फळीतील नेतृत्व विकसित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'राज्य कार्यकारी समिती' या सर्वोच्च रचनेत सहभागी झाले. दाभोलकरांच्यासोबत अनेक मोहिमा, परिषदा, आंदोलने व उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला. त्यानंतर क्रमाने संजय बनसोडे हे मागील काही वर्षे राज्य प्रधान सचिव या दुसऱ्या क्रमांकाच्या महत्त्वाच्या पदाची जबाबदारी समर्थपणे पार पाडत होते. संघटना फुटीच्या कालखंडात आणि ट्रस्ट व कुटुंबीय गटाने निखालस खोटे व निराधार आरोप करीत कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम तयार करण्याचा प्रयत्न चालविला असताना संजय सर खंबीरतेने व ठामपणे कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांच्या पाठीशी उभे राहिले आणि कार्यकर्त्यांना वास्तव व सत्य समजावून सांगण्यात त्यांनी पुढाकार घेतला. मागील राज्य कार्यकारिणीत माधव बावगे कार्याध्यक्ष असताना संजय सर प्रधान सचिव होते. या तीन वर्षांत राज्य कार्यकारिणी बैठकांचे कामकाज चालविणे, कार्यकारी समितीच्या ऑनलाईन/ऑफलाईन बैठका आयोजन करणे, आवश्यकतेप्रमाणे राज्यभर कार्यकर्त्यांसोबत संपर्क, संवाद साधणे, कामाचा आढावा घेणे ही सर्व संघटनात्मक कामे बावगे सरांसोबत करीत होते.

**संघटनेच्या मुशीतून घडलेले नेतृत्व**

संजय सर हे संघटनेच्या मुशीतून घडलेले नेतृत्व आहे. सर विद्यार्थिदशेत असतानाच महाराष्ट्र अंनिसच्या कामात आले. त्या काळात इस्लामपुरातील चारही महाविद्यालयातील प्राचार्य महाराष्ट्र अंनिसच्या कार्याशी जोडलेले होते. त्यांच्या प्रभावातून सर संघटनेत सक्रिय झाले. अगदी शाखेतील क्रियाशील कार्यकर्ता, शाखा प्रधानसचिव, शाखा कार्याध्यक्ष, जिल्हा प्रधानसचिव, कार्याध्यक्ष, राज्य कार्यवाह, राज्य सरचिटणीस, राज्य प्रधानसचिव आणि आता राज्य कार्याध्यक्ष असे चढत्या क्रमाने संघटनेत उमेदवारी करत साथी संजय सर आता राज्य कार्याध्यक्ष या सर्वोच्च पदावर पोहोचले आहेत. या प्रत्येक टप्प्यावर आपली कार्यक्षमता व बांधिलकी सिद्ध करीतच ते पुढच्या पदावर पोहोचले आहेत. त्या अर्थाने बनसोडे सर हे संघटनेच्या मुशीतून घडलेले नेतृत्व आहे.

इस्लामपूर ही संजय सरांची मातृशाखा आहे. अनेक उपक्रमांमुळे महाराष्ट्रातील अव्वल शाखांमधील एक आहे. आपल्या शाखेला अग्रेसर ठेवण्यात सरांचा सिंहाचा वाटा आहे. सांघिक भावनेने काम करणे, संघटनेच्या पलीकडे जीवाभावाचे मैत्रीचे नाते तयार करणे, एकमेकांना सुखदु:खात सोबत साथ करणे, अडचणीच्यावेळी कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहणे हे इस्लामपूर शाखेचे गुणविशेष आहेत. येथील प्रत्येक कार्यकर्त्याच्या जडणघडणीत या सर्व गोष्टींचा प्रभाव राहिला आहे. महाविद्यालयीन तरुणांसाठी असलेल्या विवेक वाहिनीच्या महाराष्ट्रातील केंद्रांपैकी इस्लामपुरातील आर.आय.टी. महाविद्यालयाचे उत्कृष्ट केंद्र होते. त्यामुळे सतत संघटना प्रवाही राहिली व शाखेत तरुणांचा सहभाग राहिला. त्यातील अनेक तरुण पुढे समितीच्या जिल्हा-राज्यातील पदे जबाबदारीने सांभाळत आहेत. त्याचे श्रेय अर्थातच प्रा. डॉ. नितीन

शिंदे व बनसोडे सरांना द्यावे लागेल. सांस्कृतिक अभिव्यक्ती हा देखील इस्लामपूर शाखेला पुढे नेणारा गुणविशेष. संघटनेचे दशकपूर्ती, द्विदशकपूर्ती, रौप्यपूर्ती ते त्रिदशकपूर्ती अधिवेशनात इस्लामपूर शाखेने दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. डॉ. दाभोलकरांच्या खुनानंतर 'रिंगणनाट्य' हा नवीन नाट्यप्रकार ज्येष्ठ नाट्यकर्मी अतुल पेठेंच्या मार्गदर्शनात विकसित झाला. 'सॉक्रेटिस ते दाभोलकर-पानसरे व्हाया तुकाराम' हे इस्लामपूर शाखेचे 'रिंगणनाट्य' भारतभर गाजले. देशातील अनेक शहरांत या नाट्याचे प्रयोग झाले. त्यात संजय सर प्रमुख भूमिका साकारत असत.

विज्ञान बोधवाहिनी हा अत्यंत महत्त्वाचा फिरत्या नभांगणासह, वैज्ञानिक खेळ, पोस्टर प्रदर्शन व चमत्कार सादरीकरण ते पुस्तक विक्री असा परिपूर्ण उपक्रम केवळ इस्लामपूर शाखेच्या पुढाकारानेच पूर्वीही सुरू होता व आताही सुरू आहे. त्याचे सर्व नियोजन, हिशोब, तांत्रिक बाजू ते वैचारिक बाजू, पुस्तक विक्री, मासिकाचे वर्गणीदार नोंदविणे, जाहिराती-देणग्या मिळविणे असे नॉन रिवॉर्डिंग जॉब करण्यात देखील इस्लामपूर शाखा नेहमी पुढे असते. संघटनेच्या फुटीनंतर आपल्या स्वतःच्या 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या मुखपत्राचे संपादन, प्रकाशन व वितरण हे सर्व काम इस्लामपुरातून चालते. यासोबत नेहमीची जटानिर्मूलन, सत्यशोधकी विवाह, जाहीर भाषणे, प्रासंगिक आंदोलने ही कामे सुरूच असतात. इतक्या आघाड्यांवर एकाचवेळी चालणारी कामे अर्थातच संजय सरांसारखे समर्पित भावनेने काम करणारे बिनीचे कार्यकर्ते असल्यामुळेच शक्य आहे. यासोबत इस्लामपूर येथे तक्षशिला ज्ञान केंद्र हे रचनात्मक काम त्यांच्या पुढाकाराने आकाराला आले आहे.

संजय सरांनी आपल्या आयुष्यातील सर्वाधिक काळ हा महाराष्ट्र अंनिसच्या कामात सक्रियपणे घालविला आहे. त्यांची संघटनेप्रतिची बांधिलकी आणि संघटनेतील विविध कामे अंगावर घेऊन जबाबदारीने पार पाडण्याची धडाडी लक्षात घेता संघटनेची त्यांच्याकडून अपेक्षा वाढत होती व त्यांना स्वतःलाही तशी गरज जाणवत होती. त्यामुळे संघटनेला अधिक वेळ देता यावा यासाठी त्यांनी चार वर्षांपूर्वीच स्वेच्छा निवृत्ती घेतली होती. तेव्हापासूनच महाराष्ट्र अंनिसच्या कार्याध्यक्षपदाची धुरा भविष्यात संजय सरांकडे येईल हे संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांत गृहीत होते. ते या निवडीने प्रत्यक्षात आले आहे. डॉ.नरेंद्र दाभोलकर कार्याध्यक्ष असताना आपल्याच काही पुरोगामी मित्रांकडून, मित्र संघटनांकडून आणि मोजक्या का असेना तथाकथित समाजधुरिणांकडून 'महाराष्ट्र अंनिसचे नेतृत्व ब्राह्मणी आहे' या टीकेला संघटनेला सामोरे जावे लागले आहे. तो आरोप आपण त्यावेळी खोडूनही काढला आहे. पण कार्याध्यक्षपदी निवडीनंतरच्या पहिल्याच मनोगतात शहादा येथे संजय सरांनी 'माझी कार्याध्यक्षपदी झालेली निवड ही ब्राह्मणी नेतृत्वाविषयीच्या आरोपाला चोख कृतिशील उत्तर आहे' असे स्पष्ट करून त्याबाबत आनंद व्यक्त केला.

**आश्वासक नेतृत्व**

महाराष्ट्र अंनिस ही विधायक समाजबदलाची चळवळ आहे. माणसे बदलतात यावर आपला विश्वास आहे. या बदलाची सुरुवात स्वतःपासून करावी लागते. संजय सरांची एक आक्रमक लढाऊ कार्यकर्ता ते प्रेमाने संघटनेला कवेत घेऊ इच्छिणारे नेतृत्व ही बदललेली प्रतिमा खरोखरच आश्वासक आहे. माणसाने उदार असणे, माफ करायला शिकणे, सुसंवाद, प्रेम व करुणेतून प्रश्न सोडविणे हे संघटनेच्या ताणतणावाच्या काळात आम्ही शिकलो, असे संजय सर अनेकदा सांगतात ते अगदी खरे आहे. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वात जाणीवपूर्वक असा बदल त्यांनी केला आहे. तो नक्कीच स्वतःला उन्नत करणारा आहे.

'अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम ही शतकांची लढाई आहे', असे डॉ. नरेंद्र दाभोलकर नेहमी सांगत. त्यामुळे संघटनेतील आव्हानात्मक कालखंड संपून एक स्थैर्य आले असले तरी रोज नवीन अंधश्रद्धा, नवीन बुवाबाजी, भ्रामक विज्ञान, जीवनाच्या विविध क्षेत्रांत स्वार्थापोटी तयार केले जाणारे भ्रम आणि त्यायोगे शोषणाच्या नवीन क्लृप्त्या येतच राहणार आहेत. पण विवेकाची कास धरत त्या सर्व आव्हानांना भिडण्यासाठी संघटनात्मक व वैचारिक सर्व पातळींवर संघटना मजबूत, सक्षम करणे आणि समर्पित भावनेने काम करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांना प्रेरित करून आपल्या कामाचा पोत व परीघ विस्तारण्याची अपेक्षा संजय सरांचे नेतृत्व नक्कीच पूर्ण करेल, असा विश्वास व्यक्त करतो.

**(लेखक महा.अंनिसला निधी व्यवस्थापक विभागाचे राज्यकार्यवाह आहेत.)**

●



# विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठक

**डॉ. टी. आर. गोराणे ।** नाशिक
मो. ९४२०८२७९२४

लोणखेडा, शहादा (जिल्हा नंदुरबार) येथे दि. ३०-३१ मे व १ जून २०२५ अशी तीन दिवसांची महाराष्ट्र अंनिसची विस्तारित राज्य कार्यकारिणीची बैठक अतिशय उत्साहात संपन्न झाली. बैठकीच्या पहिल्या दिवशी पहिल्या सत्राच्या सुरुवातीला प्रथमतः ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ आणि संघटनेचे हितचिंतक, पाठीराखे डॉ. जयंत नारळीकर यांच्या निधनाबद्दल तसेच पहलगाम येथील अतिरेकी हल्ल्यात बळी पडलेल्या पर्यटकांना आदरांजली वाहण्यात आली. विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीत सादर झालेल्या राज्यविभागांच्या कामकाजांचे संक्षिप्त अहवाल.

● युवा विभाग - राज्य कार्यवाह प्रियांका खेडेकर यांनी अहवाल सादर करताना म्हटले की, या विभागाच्या दरमहा बैठका होतात. पूर्वी युवा परिषदा होत असत. पुढे सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश करून 'सोच' (SOCH - Scientific, Optimistic, Creative, Humanist) ही संकल्पना अस्तित्वात आली. नुकतेच सोचचे तीन दिवसीय शिबिर खेड (राजगुरूनगर) येथे उत्साहात संपन्न झाले. युवा शिबिरार्थींची संख्या १०५ होती. यापुढे अशीच शिबिरे संपूर्ण राज्यात विभागवार घेता येतील का, यावर चर्चा झाली. या विभागांतर्गत प्रशिक्षण शिबिरांची तसेच मोहिमा अथवा अभियान दौऱ्यांची गरज असल्याचे खेडेकर यांनी प्रतिपादन केले.

● महिला सहभाग विभाग-राज्य कार्यवाह आरती नाईक यांनी मागील तीन वर्षांचा संक्षिप्त अहवाल अतिशय आकर्षक आणि उत्कृष्ट पद्धतीने बैठकीत सादर केला. या विभागाने महिलांच्या ऑनलाईन सदस्य नोंदणीचे विशेष अभियान राबवले. त्यामुळे राज्यातून तसेच राज्याबाहेरीलसुद्धा सदस्यांची मोठी नोंदणी झाली. विभागाची दर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी ऑनलाईन बैठक होत असते. 'ग्रेट भेट' किंवा महिलांच्या अन्याय, अत्याचारासंबंधी तज्ज्ञांचे परिसंवाद असेही अनेक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम वेळोवेळी घेण्यात आले. पुढील काळात हा विभाग अधिक गतिमान करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जातील, असाही निर्धार आरती यांनी व्यक्त केला.

● प्रशिक्षण विभाग-राज्य कार्यवाह सुरेश बोरसे यांनी झालेल्या प्रशिक्षणांची माहिती दिली. संघटनेच्या सर्व विभागांच्या कार्यकर्त्यांना स्वतंत्रपणे प्रशिक्षण देण्याची योजना त्यांनी मांडली. प्रशिक्षणासाठी स्वतंत्र स्थळ, जागा, केंद्र असणे आवश्यक आहे. याबद्दल बैठकीत चर्चा झाली.

● निधी संकलन व व्यवस्थापन विभाग - राज्य कार्यवाह परेश शाह यांनी जाहिराती, देणग्या, वर्गणीदार या माध्यमातून मागील आर्थिक वर्षांमध्ये संघटनेकडे जमा झालेली आणि खर्च झालेली रक्कम याचा लेखाजोखा सविस्तररीत्या मांडला. झालेल्या ऑडिटबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. सध्या निधी संकलनासाठी मोजकेच कार्यकर्ते प्रयत्नशील असतात. ती संख्या वाढल्यास संघटनेच्या निधीमध्ये वाढ होऊन अनेक उपक्रमांचा विस्तार करता येईल, असे आग्रही प्रतिपादन शाह यांनी केले.

● प्रकाशन विभाग-या विभागाबद्दल राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे यांनी माहिती दिली. प्रकाशन विभागाचे काम थांबलेले आहे. ते गतिमान करण्यासाठी अनुभवी कार्यकर्त्यांची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. संघटनेचा लोगो व इंग्रजीमधील नाव यास अधिकृत परवानगी मिळाल्याचेही संजय बनसोडे यांनी सांगितले.

● अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका-मासिकाचे संपादक डॉ. नितीन शिंदे यांनी याबद्दलची अद्ययावत माहिती दिली. मासिकाचे मागील सर्व अंक वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. विविध विभागांची माहिती अपलोड करण्याचे काम चालू असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक महिन्याच्या अंकाच्या संपादनात संपादक मंडळातील सदस्य आळीपाळीने अतिथी संपादक म्हणून जबाबदारी पार पाडतात. कार्यकर्त्यांना लेखनासाठी मार्गदर्शन व्हावे यासाठी विभागातर्फे ऑनलाईन लेखन कार्यशाळा घेण्यात आली. पत्रिकेच्या कार्यालयासाठी स्वतंत्र जागा असावी या प्रस्तावावर चर्चा झाली.

● विविध उपक्रम विभाग - राज्य कार्यवाह अनिल करवीर यांनी सांगितले की, या विभागांतर्गत बावीस उपक्रम चालू आहेत. त्याची डेटा बँक तयार आहे. हिंदूंच्या व्यतिरिक्त इतर धर्मांतील २० टक्के उपक्रम असावेत असे ठरले. चमत्कार सादरीकरणासाठी नवनवीन चमत्कारांच्या प्रात्यक्षिकांची निर्मिती करण्यात यावी, असे त्यांनी

सुचविले. पुढील काळामध्ये विविध उपक्रम राबविण्यासाठी महसूल विभागनिहाय टीम तयार करण्यात याव्यात. त्यात जास्तीत जास्त उपक्रम घेण्यासाठी ॲप तयार करावे, असे ठरले. या विभागाची मार्गदर्शक पुस्तिका तयार करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. आधुनिक अंधश्रद्धांची, छद्मविज्ञानाची पोलखोल करणारी परिषद आयोजित करावी, यावर चर्चा झाली. राष्ट्रीय पातळीवर अशी परिषद आयोजित करण्याचे ठरले.

● जातपंचायत मूठमाती अभियान – राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी आतापर्यंत झालेल्या कार्याची माहिती दिली. विद्यापीठ स्तरावर या विषयावर संशोधन होते आहे. सिनेमा क्षेत्रात देखील हा विषय घेतला जातो आहे. या विषयावरील शासन निर्णयांवर चर्चा झाली. मढी येथील वैदू समाजाची जातपंचायत नाशिकच्या कार्यकर्त्या कोमल वर्दे यांनी थांबविली. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

● विज्ञान बोधवाहिनी – राज्य कार्यवाह भास्कर सदाकळे व सहकार्यवाह बाबा हलकुडे यांनी माहिती दिली. पुढील काळात जिल्ह्यांशी संपर्क करून विज्ञान बोधवाहिनी कार्यरत करण्याचे ठरले. जिल्हा पदाधिकाऱ्यांनी राज्य कार्यवाह सदाकळे यांच्याशी संपर्क साधून हा उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील राहावे असे सुचविण्यात आले.

● कायदा व्यवस्थापन विभाग– राज्य कार्यवाह ॲडव्होकेट मनीषा महाजन यांनी माहिती दिली. देशव्यापी कायदा होण्यासाठी काही सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे प्रयत्न चालू आहेत. संघटनांतर्गत विभागांकडून आलेल्या प्रकरणांवर मार्गदर्शन केले जाते. सर्वसाधारणपणे येणाऱ्या प्रकरणांसाठी मार्गदर्शक ठरेल अशी पुस्तिका तयार करण्याचे काम चालू असल्याचे ॲडव्होकेट महाजन यांनी सांगितले. पुढील काळात या विभागामार्फत कायद्याच्या प्रबोधनासाठी प्रशिक्षण शिबिरे घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

● बुवाबाजी विरोधी संघर्ष – राज्य कार्यवाह ॲडव्होकेट गोविंद पाटील यांनी सांगितले की, या विभागाच्या कामात फारशी प्रगती झाली नाही किंवा प्रशिक्षण शिबिरेही घेता आली नाहीत. राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे यांनी बुवाबाजी भांडाफोडची काही प्रकरणे हाताळली; त्यांचा अहवाल तयार करण्यात आला आहे. राज्य–जिल्हा असा समन्वय वाढवण्याचे ठरले.

● विवेकवाहिनी– राज्य कार्यवाह प्रा. डॉ. सविता शेटे यांनी विवेकवाहिनी विभागाची सुरुवातीपासूनची संक्षिप्त माहिती दिली. प्रत्येक जिल्ह्यात पाच विवेकवाहिनी सुरू करण्याचे ठरले होते; पण त्यात फारशी प्रगती झाली नाही. याविषयावरील मार्गदर्शक पुस्तिकेचा मसुदा अंतिम करण्याचे काम चालू आहे. या विभागात युवा कार्यकर्त्यांची आवश्यकता असल्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

● सोशल मीडिया विभाग–राज्य कार्यवाह कीर्तिवर्धन तायडे यांनी आकडेवारीसह या विभागात चाललेल्या कामाचे विश्लेषण सादर केले. वेबसाईट ओपन करण्याचे प्रात्यक्षिक उत्तम जोगदंड यांनी करून दाखवले. स्क्रीन टाईम व इतर मोबाईल फंक्शन वापरण्यासाठी, ते व्हायरल करण्यासाठी, तपासण्यासाठीची माहिती कृष्णात कोरे यांनी दिली. कार्यकर्त्यांनी सोशल मीडियामध्ये सकारात्मकरीत्या क्रियाशील असावे, असे नंदकिशोर तळाशिलकर यांनी सुचविले. 'चला उत्तर देऊ या', अशी टीम तयार असल्याचे त्यांनी सांगितले.

● मिश्रविवाह विभाग – याबद्दल अतुल बडवे यांनी माहिती दिली. असा विवाह केलेले जोडपे बैठकीत उपस्थित होते. ज्येष्ठ मार्गदर्शक आदरणीय अशोकभाई शाह यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

● वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प – राज्य कार्यवाह दिगंबर कट्यारे यांनी शिक्षक प्रशिक्षणे व स्वयंअध्ययन प्रश्नपत्रिकांबद्दल सविस्तर माहिती दिली. प्रश्नपत्रिकांची मागणी नोंदविण्याचे आवाहन त्यांनी केले. या विभागाची मार्गदर्शक पुस्तिका तयार करणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. शाखांनी राबविलेल्या या उपक्रमाची माहिती राज्य विभागाकडे वेळोवेळी कळवावी असे आवाहन सहकार्यवाह विलास निंबोरकर यांनी केले.

● राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय समन्वय विभाग–राज्य कार्यवाह प्रा. डॉ. सुदेश घोडेराव यांनी आतापर्यंत झालेल्या कामाची माहिती दिली.

● दस्तऐवज संकलन विभाग – राज्य कार्यवाह डॉ. सुरेश बिऱ्हाडे यांनी सांगितले की, या विभागांतर्गत फारसे काही काम झाले नाही.

● कार्यालयीन व्यवस्थापन विभाग–राज्य कार्यवाह उत्तरेश्वर बिराजदार यांनी लातूर येथील कार्यालयात झालेल्या कामकाजाची माहिती दिली. मात्र राज्य कार्याध्यक्ष यांचे स्वतंत्र कार्यालय असण्याची निकड त्यांनी व्यक्त केली.

विभागांच्या अहवाल सादरीकरणानंतर राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी सांगितले की, प्रत्येक विभागाचे राज्य कार्यवाह व सहकार्यवाह यांनी राज्यभर दौरे करावेत. त्यांनी आपापल्या विभागाचे काम प्रत्येक जिल्ह्यात कसे प्रगतिपथावर राहील यासाठी प्रयत्न करावेत. त्यासाठी कार्यकारी समितीसह इतरांची मदत, सहकार्य घ्यावे. संघटनांतर्गत कामाच्या वाढत्या गरजेपोटी नवीन चार विभाग तयार करण्यात आल्याचे राज्य सरचिटणीस विनायक सावळे यांनी सांगितले. ते पुढीलप्रमाणे–

● व्यसन : प्रबोधन आणि संघर्ष विभाग.

- संविधान जागर विभाग.
- सर्वेक्षण आणि संशोधन विभाग.
- संपर्क आणि समन्वय विभाग.

हे विभाग निर्माण करण्याची गरज आणि त्या त्या विभागाची उद्दिष्टे याबद्दल सावळे यांनी सविस्तर माहिती दिली. विचार कृतिपत्रिकेच्या राज्य कार्यकारिणी निवड विशेषांकामध्ये याबद्दलची सविस्तर माहिती असल्याचे त्यांनी सांगितले. तीन दिवसांत संघटनांतर्गत अनेक विषयांवर सखोल आणि अर्थपूर्ण चर्चा झाली. त्यामधून काही निर्णय आणि ठराव झाले, ते पुढीलप्रमाणे –

- संघटनेचे स्वतःचे असे एक मध्यवर्ती कार्यालय असावे.
- आदिवासी, ग्रामीण व शहरी विभागातील जास्तीत जास्त शाळा- महाविद्यालये यांमधून वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या प्रचार, प्रसारासाठी सप्रयोग व्याख्याने, प्रदर्शने, इच्छुकांसाठी प्रशिक्षण शिबिरे असे कार्यक्रम, उपक्रम सातत्याने आयोजित करण्यात यावेत.
- महिलांना आणि युवकांना संघटनेच्या कामात प्रयत्नपूर्वक जोडून घेणे. त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देणे.
- धर्माच्या नावाखाली देशात फोफावत चाललेली भोंदूगिरी रोखण्यासाठी राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर प्रबोधन मोहिमेचे आयोजन करणे.
- जादूटोणा, काळी जादू, अनिष्ट, अघोरी, अमानुष व कालबाह्य रूढी, प्रथा, परंपरा व त्यांच्याआधारे चालणारी भोंदूगिरी थांबवण्यासाठी केंद्र सरकारने सर्वंकष कायदा करावा यासाठी संघटनेने सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणे.
- संघटनात्मक व उपक्रमात्मक कामांबाबत अग्रेसर ठरणाऱ्या शाखा व जिल्हा यांना दरवर्षी विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीमध्ये पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. त्याबाबतचे निकष लवकरच निश्चित केले जातील.

पुढील राज्य कार्यकारिणीची बैठक २७-२८ सप्टेंबर २०२५ रोजी होईल. बैठकीचे स्थळ नंतर कळविण्यात येईल. मात्र या बैठकीसाठी फक्त राज्य पदाधिकारी, निमंत्रित राज्य पदाधिकारी, जिल्हा कार्याध्यक्ष व जिल्हा प्रधानसचिव यांचीच उपस्थिती अपेक्षित असेल.

**(लेखक महा. अंनिसचे राज्य प्रधान सचिव आहेत.)**

●

## लक्ष्यवेधी कार्यकर्ता पुरस्कार-२०२५


**मनोहर तांडेल** (रायगड)


**तेजल खेडेकर** (रायगड)


**प्राजक्ता कवळे** (रायगड)


**संदीप गायकवाड** (रायगड)


**अनिल दरेकर** (लातूर)


**इम्रान सय्यद** (लातूर)


**माधव बावगे** (लातूर)


**दशरथ भिसे** (लातूर)


**निर्मला फुलगावकर** (रायगड)


**नितीन राऊत** (रायगड)


**पी. एम. जाधव** (चंद्रपूर)


**सूर्यकांत खनके** (चंद्रपूर)


**टी. आर. गोराणे** (नाशिक)


**अरुण घोडेराव** (नाशिक)


**आशा लांडगे** (नाशिक)


**रमेश गायकवाड** (जळगाव)


**बी. आर. पाटील** (जळगाव)


**दिगंबर कट्यारे** (जळगाव)


सुनील वाघमोडे (जळगाव)


हेमंत सोनवणे (जळगाव)


अतुल सव्वाखंडे (पुणे)


सिद्धेश्वर तापकीर (पुणे)


गंगाधर सत्वधर (पुणे)


अनंत जोशी (मुंबई)


मारुती पालशेतकर (मुंबई)


सविता शेटे (बीड)


विष्णुदास लोणारे (भंडारा)


भरत कोकावार (वर्धा)


व्दारकाताई ईमडवार (वर्धा)


कविता राठोड (वर्धा)


भिका पाटील (धुळे)


विलास निंबोरकर (गडचिरोली)


काशिलिंग गावडे (सांगली)


चंद्रकांत कोळी (सांगली)


विष्णू होनमोरे (सांगली)


स्वाती कोरे (कोल्हापूर)


रामदास देसाई (कोल्हापूर)


राजेंद्र पंडित (नवी मुंबई)

विज्ञान निर्भयता नीती
दिवंगत ए. एच. शहा (नवी मुंबई)


बळीराम भुकतरे (लातूर)


बाबूराव माशाळकर (लातूर)


बिरमल खांडेकर (सोलापूर)


एस. डी. ठोंबरे (परभणी)


कीर्तीवर्धन तायडे (नंदुरबार)


बलदेव वसईकर (नंदुरबार)


प्रदीप केदारे (नंदुरबार)


श्रीकांत बाविस्कर (नंदुरबार)


अरिफ मणियार (नंदुरबार)


रामजी पाडवी (नंदुरबार)


मानसिंग वसावे (नंदुरबार)


जयश्री महाले (नंदुरबार)


शहाजी भोसले
(छ. संभाजीनगर)


डॉ. सुषमा बसवंत
(ठाणे)

## शतकवीर कार्यकर्ता पुरस्कार-२०२५


गोविंदराव ब्राह्मणवाडे
(गडचिरोली)


चेतन डोंगरवार
(गडचिरोली)


रविंद्र सोमनकर
(गडचिरोली)


हरिदास कोटरंगे
(गडचिरोली)


संतोष चिकाटे
(गडचिरोली)


विलास पारखी
(गडचिरोली)


मोतीराम नहामुर्ते
(गडचिरोली)


संजय शेंडे
(नागपूर)


प्रशांत कांबळे
(छ. संभाजीनगर)

## लक्ष्यवेधी शाखा पुरस्कार-२०२५

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : जामनेर, जि. जळगाव

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : जळगाव, जि. जळगाव

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : ऊर्जानगर, जि. चंद्रपूर

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : नाशिक शहर, जि. नाशिक

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : नाशिकरोड, जि. नाशिक

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : लातूर, जि. लातूर

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा :इस्लामपूर, जि. सांगली

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : अलिबाग, जि. रायगड

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : पनवेल, जि. रायगड

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : शिंदखेडा, जि. धुळे

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : वर्धा, जि. वर्धा

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : नंदुरबार, जि. नंदुरबार

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : शहादा, जि. नंदुरबार

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : पिंपरी चिंचवड, जि. पुणे

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : गडचिरोली, जि. गडचिरोली

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : दादर, जि. मुंबई

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : करमाळा, जि. सोलापूर

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : करवीर, जि. कोल्हापूर

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : घणसोली, जि. नवी मुंबई

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : उदगीर, जि. लातूर

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : बीड, जि. बीड

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : छ. संभाजीनगर, जि. छ. संभाजीनगर

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : तळोदा, जि. नंदुरबार

# विस्तारित राज्य कार्यकारिणी, २०२५ : क्षणचित्रे

महाराष्ट्र अंनिसची विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठक यावर्षी लोणखेडा (ता. शहादा, जि. नंदुरबार) येथील पूज्य सानेगुरुजी विद्याप्रसारक मंडळ परिसरात दि. ३० मे ते १ जून २०२५ अशी तीन दिवस आयोजित करण्यात आली होती. संघटनेच्या इतिहासातील एक अभूतपूर्व म्हणून ही बैठक सर्वांच्या कायम लक्षात राहील.

- पुढील तीन वर्षांसाठी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीची त्रैवार्षिक निवड या बैठकीत करण्यात आली.
- गेल्या काही वर्षांतील संघटना स्तरावर घडलेल्या अप्रिय घटनांची पार्श्वभूमी या बैठकीला होती. परंतु 'संकटे दाही दिशा, जडली झुंजायाची नशा...' अशा भावनेने या संकटांवर मात करून कार्यकर्ते आले होते आणि त्यांचा उत्साह अवर्णनीय होता.
- बैठकीसाठी जवळपास ४०० कार्यकर्त्यांनी नोंदणी केली होती. प्रत्यक्षात ४६० कार्यकर्ते महाराष्ट्रभरातून बैठकीस उपस्थित राहिले. संघटनेच्या इतिहासात एवढी जबरदस्त उपस्थिती प्रथमच लाभली. विशेष म्हणजे शहादा हे ठिकाण रेल्वेने थेट जोडलेले नसताना, शक्य असेल तिथपर्यंत रेल्वेने, नंतर बस-रिक्षाने किंवा संपूर्ण प्रवास एस.टी./ट्रॅव्हल्स बसने प्रवास करून अनेक गैरसोयींना तोंड देऊन कार्यकर्ते बैठकीस उत्साहाने उपस्थित राहिले.
- बैठकीसाठी लाभलेला परिसर खूप मोठा होता. हा सर्व परिसर कार्यकर्त्यांच्या संपर्कामुळे तीन दिवसांसाठी अक्षरशः मोफत मिळाला होता. पूज्य सानेगुरुजी विद्याप्रसारक विद्यालयाच्या विश्वस्त मंडळाची सामाजिक बांधिलकी, महाराष्ट्र अंनिसच्या कार्याप्रति असलेली आपुलकी आणि विश्वास खरोखरच वाखाणण्याजोगा आहे, हे लक्षात आले.
- बैठकीचा प्रारंभ वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने झाला. डाकीण प्रथेचा बळी ठरलेल्या महिलांपैकी दोघींना या बैठकीच्या उद्‌घाटनासाठी आमंत्रित केले होते. उपस्थितांनी या संकल्पनेचे स्वागत करून आपण या महिलांच्या समर्थनार्थ उभे आहोत हे दाखवून दिले.
- अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका पुरस्कार समारंभासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून नर्मदा बचाव आंदोलनासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या मेधाताई पाटकर लाभल्या होत्या. या प्रसंगी ८५ पुरस्कारांचे वितरण करताना त्या पूर्णवेळ उभ्या होत्या. काही पुरस्कार विजेत्यांची आपुलकीने चौकशी करत होत्या. त्यातील काही जणांना 'आपण अमुक साली तमुक ठिकाणी एका कार्यक्रमात भेटलो होतो ना...' अशी आठवण करून देत होत्या. त्यानंतर भाषण करण्यासाठी त्यांनी बसून बोलावे असे सुचवले असता त्यास नकार देवून त्यांनी पोडियमजवळ जाऊन आपले संपूर्ण भाषण केले.
- दुसऱ्या दिवशीच्या खुल्या परीसंवादासाठी प्रमुख वक्ते म्हणून ह.भ.प. श्यामसुंदर सोन्नर महाराज आणि ह.भ.प. ज्ञानेश्वर बंडगर महाराज उपस्थित होते. महाराष्ट्र अंनिस ही संतांचा वारसा पुढे घेऊन जाणारी चळवळ कशी आहे, याचे संत-वचनांचा दाखला देऊन निरूपण केले. तसेच आपण महाराष्ट्र अंनिसच्या मागे सदैव उभे राहाणार आहोत, याची ग्वाही दिली.
- जेवणासाठी जी व्यवस्था करण्यात आली होती त्या ठिकाणी कार्यकर्त्यांना वनभोजनाचा लाभ घेण्याचा आनंद मिळाला. जेवण वाढण्यात कसलीही कंजुषी नव्हती. शेवटच्या दिवशी तर ज्यांना हवे त्यांना जेवण 'पार्सल' करून देण्यात आले.
- बैठकीसाठी कार्यकर्त्यांनी एकदिलाने जी मेहनत घेतली त्यास तोड नाही. सभागृह, विचारपीठ, बाहेरचा परिसर या ठिकाणची सजावट अगदी विचारपूर्वक केलेली वाटली. जागोजागी लावलेले पोस्टर्स/बॅनर्स संघटनेच्या, स्थानिक/जिल्हा शाखेच्या कार्याचा परिचय करून देणारे होते. संघटनेचे कोणतेही काम एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून एकदिलाने कसे करावे याचा वस्तुपाठ या कार्यकर्त्यांनी घालून दिला.
- शहादा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा गांधी पुतळा या मार्गावर संविधान जागर फेरीचे आयोजन करण्यात आले. संविधानविषयक पोस्टर्स, घोषणा यांनी परिसर दुमदुमून गेला होता.
- शहादा हे उन्हाळ्यात अत्यंत उष्ण असे ठिकाण; पण यावेळेस पावसाळा वेळेआधी सुरू झाल्याने तापमानात बरीच घट झाली होती. निसर्गाची साथही अशा प्रकारे या कार्यक्रमास लाभली.
- बैठकीसाठी प्रथमच आलेल्या कार्यकर्त्यांना संघटनेची राज्यस्तरावरील ताकद दिसून आली. छोट्या, मोठ्या स्थानिक शाखांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा हुरूप या बैठकीमुळे वाढला.

●

# संविधान सन्मान रॅलीने वेधले लक्ष

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीचे औचित्य साधून शहादा शहरात संविधान सन्मान रॅलीचे दि. १ जून, २०२५ रोजी आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत शहादा शहरातील विविध सामाजिक संस्था-संघटनांसह राज्यभरातील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

शहादा शहरातील छ. शिवाजी महाराज यांच्या स्मारकाला अभिवादन करून सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास रॅलीला सुरुवात झाली. या ठिकाणी कार्यकर्त्यांनी चळवळीच्या विविध गीतांचे सादरीकरण केले. सांस्कृतिक अभिव्यक्ती विभाग राज्य कार्यवाह अनिल शोभना वसंत, युवा सहभाग विभाग राज्य कार्यवाह प्रियांका खेडेकर, संविधान जागर विभाग कार्यवाह ॲड. परिक्रमा खोत यांच्यासह युवासाथींनी संविधान जागर गीतांनी रॅलीत जोश भरला. छ. शिवाजी महाराजांच्या स्मारकाला अभिवादन केल्यानंतर रॅली पुढे गेली. स्टेट बँके समोरील महात्मा फुले यांच्या स्मारकाजवळ पोहोचल्यावर त्या ठिकाणी उपस्थित कार्यकर्त्यांनी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून मेन रोड मार्गाने संविधानविषयक जनजागृती घोषणा देत रॅली उपविभागीय अधिकारी कार्यालयाबाहेरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकस्थळी पोहोचली. या ठिकाणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष माधव बावगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्या समवेत राज्यभरातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

त्यानंतर रॅली जनता चौकातील महात्मा गांधी पुतळा या समारोपस्थळी पोहोचली. या ठिकाणी सुमारे १५ ते २० मिनिटे कार्यकर्त्यांनी विविध राष्ट्रीय घोषणा, राष्ट्रीय एकात्मता गीते, संविधानविषयक गीते यांद्वारे प्रबोधन केले. समारोपप्रसंगी अभिवादन गीत सादर करताना रॅलीतून जोश व्यक्त झाला. राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे म्हणाले की, भारतीय संविधानातील मूल्ये जपण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन संघटितपणे लढा दिला पाहिजे. संविधान हा मानवमुक्तीचा जाहीरनामा असून त्याच्या सन्मान व रक्षणाची जबाबदारी प्रत्येक भारतीय नागरिकाची आहे. संविधानाचा मूल्याशय समाजात रुजविण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिति सातत्याने काम करीत असून यापुढे देखील अधिक प्रभावीपणे संविधानाबाबत संघटना काम करीत राहील, असा निर्धार त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेच्या सामूहिक वाचनाने रॅलीची सांगता झाली. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष माधव बावगे, उपाध्यक्ष संजय शेंडे, संतोष आंबेकर, राज्य प्रधानसचिव गजेंद्र सुरकार, डॉ. ठकसेन गोराणे, विनायक सावळे, रुक्साना मुल्ला, विजय परब, कार्यकारी समितीचे सदस्य आरती नाईक, सुधाकर काशीद,



महाराष्ट्र अंनिसच्या शहादा येथे काढलेल्या संविधान सन्मान रॅलीत सहभागी झालेले कार्यकर्ते.

विलास निंबोरकर, कृष्णात कोरे, शहाजी भोसले, सुरेश बोरसे, उत्तरेश्वर बिराजदार, डॉ. बी. डी. पटेल सामाजिक कार्यकर्ते अनिल कुवर, संजय निकुंबे आदींसह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

रॅलीच्या यशस्वितेसाठी नंदुरबार जिल्हा कार्याध्यक्ष वसंत वळवी, प्रधानसचिव रायसिंग पाडवी, रवींद्र पाटील, आरिफ मणियार, श्रीकांत बाविस्कर, सुवर्णा जगताप, भारती पवार, जयश्री महाले, संतोष महाजन, कीर्तिवर्धन तायडे, प्रवीण सावळे, प्रवीण महिरे, प्रदीप केदारे, आदींसह शहादा शाखेच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. ●

## उद्घाटन सत्र

विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीचे उद्घाटन डाकीण प्रथेच्या कलंकातून मुक्त झालेल्या महिलांच्या हस्ते करण्यात आले. सेवीबाई वसावे (सरी, ता. अक्कलकुवा), फोतीबाई वसावे (पाणबारी, ता. अक्कलकुवा), बोंडीबाई राऊत (काठी, ता. अक्कलकुवा) या तिन्ही महिलांचा उद्घाटकांमध्ये प्रातिनिधिक स्वरूपात समावेश होता. डाकीण ठरवण्यात आलेल्या महिलांना शोषण, शिवीगाळ, बहिष्कार अशा प्रकारच्या छळाला सामोरे जावे लागते. एका महिलेची अशा स्वरूपातील छळातून सोडवणुकीच्या अनोख्या प्रतीकात्मक कृतीने बैठकीचे उद्घाटन करण्यात आले.

उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे समन्वयक प्रा. मकरंद पाटील होते. सुरुवातीला खगोलशास्त्रज्ञ व अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे मार्गदर्शक डॉ. जयंत नारळीकर आणि पहलगाम येथील हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना आदरांजली वाहण्यात आली.

महा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती नंदुरबार जिल्ह्याचे माजी अध्यक्ष डॉ. शशांक कुलकर्णी यांनी स्वागतपर निवेदन केले. त्यांनी आपल्या मनोगतातून नंदुरबार जिल्ह्यात अनेक सहकारी कार्यकर्ते अंधश्रद्धा निर्मूलनाच्या विविध क्षेत्रात करीत असलेल्या कार्याबद्दल कौतुक व्यक्त केले. राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी उद्घाटन सत्रात बोलताना नंदुरबार जिल्ह्यात सुरू असणाऱ्या कामाबद्दल कौतुक केले. संजय बनसोडे यांनी देखील उत्तम कामासाठी नंदुरबार जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचे कौतुक केले व बैठकीच्या पुढील कामकाजासाठी सदिच्छा दिल्या.

जिल्हा कार्याध्यक्ष वसंत वळवी यांनी आपल्या प्रास्ताविकातून नंदुरबार जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा लेखाजोखा मांडला. सूत्रसंचालन हंसराज महाले यांनी केले, तर डॉ. बी. डी. पटेल यांनी आभार मानले.

## महाराष्ट्र अंनिस ही त्यागातून उभी राहिलेली संघटना : प्रा. मकरंद पाटील

अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य पुढे नेण्यासाठी अंनिसचे संस्थापक कार्याध्यक्ष डॉ. दाभोलकरांनी स्वतः खूप मोठा त्याग केला. 'पुरुषोत्तम फाउंडेशन'चा पुरस्कार स्वीकारण्यासाठी ते अत्यंत साधेपणाने एस.टी. बसने प्रवास करून शहादा येथे आले होते. आमच्या संस्थेकडून त्यांना पुरस्कार स्वीकारण्यास येण्यासाठी व परत जाण्यासाठी खास वाहनाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली होती. मात्र त्यांनी त्या खास व्यवस्थेला नम्रपणे नकार दिला होता. अशा नेतृत्वाच्या त्यागातून व त्यांच्या अनुकरणातून उभी राहिलेली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही संघटना असल्याचे गौरवोद्गार पूज्य सानेगुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे समन्वयक सचिव प्रा. मकरंदभाई पाटील यांनी अंनिसच्या विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीच्या अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले.

## अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेतील खबरबात सदरासाठी

महा. अंनिसची खबरबात या सदरासाठी आपण घेतलेले उपक्रम, कार्यक्रम, कार्यशाळा, संवाद शिबिर, ऑनलाईन व्याख्यान, कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर असे कोणतेही उपक्रमाची माहिती आपल्या **अंनिप पत्रिकेचे संपादक मंडळ सदस्य हंसराज महाले** यांच्याकडे या मो.**९६७३६०६१६०** वरती किंवा **hansrajmahale@gmail.com** मेलवर खालील स्वरूपात पाठवावी. उपक्रम व कार्यक्रमाची माहिती/मजकूर महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावा.

# हॉलमध्ये लग्न लावले म्हणून दलित कुटुंबाला मारहाण

विवाह मंडपात लग्नसमारंभ आयोजित केला म्हणून एका दलित कुटुंबावर काठ्या आणि सळ्यांनी हल्ला करण्यात आल्याची आणि त्यात दोघे गंभीर जखमी झाल्याची घटना नुकतीच घडली आहे. हल्ला करण्यापूर्वी, दलित समुदायाचे असल्याने, तुम्ही हॉलमध्ये लग्न कसे करू शकता? असे हल्लेखोरांनी ओरडून विचारल्याचे पोलिसात दाखल एफआयआर मध्ये नोंदले गेले आहे. ही घटना उत्तर प्रदेशातील आहे आणि रासरा या ठिकाणी दि. ३० मे, २०२५ रोजी घडली आहे.



## दृष्टिक्षेपात

### दलित कुटुंबाला काठ्यांनी मारहाण

**बल्लिया (उत्तर प्रदेश) :** उत्तर प्रदेशातील रासरा येथे हॉलमध्ये विवाह सोहळ्याचे आयोजन केल्याच्या रागातून एका दलित कुटुंबावर सुमारे २० जणांच्या टोळीने काठ्या व लोखंडी रॉडने हल्ला केला. ही घटना शुक्रवारी रात्री (ता.३०) घडली. आरोपींनी जातिवाचक शिवीगाळ करत दलित असूनही हॉलमध्ये लग्न का, असा सवाल करत हल्ला केला. या प्रकरणी अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार (अॅट्रॉसिटी) गुन्हा दाखल असून तपास सुरू आहे.

या बातमीचा आणि अंधश्रद्धेचा, पर्यायाने महाराष्ट्र अंनिसचा काय संबंध, असा प्रश्न कोणाला पडू शकतो. तर असा संबंध आहे. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर नेहमी सांगत की, जात हीच एक अंधश्रद्धा आहे. वरील घटना याच जात-विषयक अंधश्रद्धेतून घडलेली असल्याने आणि वंचित समुदायांच्या लोकांवर अन्याय झालेला असल्याने या घटनेला महाराष्ट्र अंनिस निषेधार्हच मानते. या घटनेने जातिभेदाची पाळेमुळे देशात किती खोलवर रुतली आहेत, हे पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. तसेच 'आता कुठे उरला आहे जातिभेद?' असा साळसूद प्रश्न विचारणाऱ्या आणि जातिभेद शिल्लक राहिलेला नाही असे मानणाऱ्या लोकांचा मुखभंग या घटनेने केला आहे. दलित समुदायाचे असल्याने तुम्ही हॉलमध्ये लग्न कसे करू शकता? या जातिवादी लोकांच्या प्रश्नाने केवळ त्यांच्यातील जात-वर्चस्वाचा अहंकारच अधोरेखित केलेला नाही तर संविधानातील समतेचे तत्त्व (अनुच्छेद १४), व्यक्तीचा धार्मिक विधीचा मूलभूत अधिकार (अनुच्छेद २५ ते २८), व्यक्तीची प्रतिष्ठा, न्याय (संविधान प्रस्ताविका) या संविधानिक मूल्यांची उघड उघड पायमल्ली केलेली दिसत आहे. भारतीय लोकांनी संविधान अंगीकृत, अधिनियमित आणि स्वत:प्रति अर्पित केल्याचा अमृत महोत्सव साजरा केल्यावर त्या उत्सवाचा उत्साह अजून ओसरलेला देखील नाही अशा वेळी ही घटना घडलेली आहे. या घटनेने प्रत्येक संविधानप्रेमी आणि देशप्रेमी व्यक्तीला धक्का बसलेला असला तरी वर्तमान सरकार/व्यवस्थेची ज्या दिशेने वाटचाल होत आहे ती पाहता आश्चर्य नक्कीच वाटलेले नसणार. या प्रकरणी गुन्हेगारांवर कायदेशीर कारवाई केली तरी त्यांना शिक्षा होईलच, याची खात्री देता येत नाही आणि समजा शिक्षा झालीच तर त्यांना पुढे माफी देऊन, तुरुंगातून बाहेर काढून त्यांचा सत्कारसुद्धा केला जाईल असे वाटण्याजोगे वर्तमान आहे; याची जाणीव सर्वांना आहे.

अनुसूचित जातिजमातींच्या लोकांवर अत्याचार होणे हे देशाला नवीन नाही. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये परिस्थिती अशी बदलली आहे की, अत्याचार करणाऱ्या लोकांचा आत्मविश्वास वाढलेला दिसत आहे. त्यांना कायद्याचे भय वाटत नाही. त्यांना संविधानिक मूल्येच काय, मुळात संविधानच मान्य नाही असे दिसते. मग त्यांना काय मान्य आहे? याचे उत्तर दलित समुदायाचे असल्याने, तुम्ही हॉलमध्ये लग्न कसे करू शकता? या त्यांच्या प्रश्नातच आहे. हॉलमध्ये लग्न करणे, नवरदेवाने घोड्यावर बसून येणे, वाजतगाजत वरात काढणे, दलिताने मिशा वाढवणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील गाण्याची कॉलर ट्यून मोबाइलमध्ये लावणे, वगैरे यास विरोध करून 'तुम्ही पायरीत रहा' असा मनुस्मृतीस अभिप्रेत असलेला संदेश अशा घटनांमधून दिला जात आहे, हे स्पष्ट आहे. हे केवळ दलितांसाठीच नव्हे तर देशाच्या एकतेसाठी, एकात्मतेसाठी घातक आहे. म्हणून, जातीच्या अंधश्रद्धेतून घडलेली ही एक साधी घटना नाही, हे लक्षात घेऊन अशा घटनांचा सार्वत्रिक निषेध केला गेला पाहिजे आणि देशापेक्षा आपली जात, आपला धर्म श्रेष्ठ मानणाऱ्या अशा प्रवृत्तींना संविधानिक मार्गाने सर्वांनी विरोध केला पाहिजे.

**उत्तम जोगदंड**



# महा. अंनिसची खबरबात

**हंसराज महाले ।** तळोदा (जि. नंदुरबार)
मो. ९६७३६०६१६०

**'करिअर मार्गदर्शन व व्यक्तिमत्त्व विकास' कार्यशाळा**

**पनवेल :** ७ जून रोजी पनवेल शाखेच्या वतीने दोधानी (ता. पनवेल) येथे दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी 'करिअर मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्त्व विकास' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षण व करिअरच्या पुढील टप्प्यासाठी योग्य दिशा देणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक MKCL रायगड जिल्हा को-ऑर्डिनेटर व महा. अंनिसचे सोशल मीडिया जिल्हा कार्यवाह सिद्धेश गोसावी होते. त्यांनी विद्यार्थ्यांशी हसतखेळत संवाद साधत, विविध इंटरॅक्टिव्ह ॲक्टिव्हिटीद्वारे व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअर निवडीचे मूलभूत पैलू उलगडून दाखवले. स्वतःची ओळख करून घेतल्याशिवाय योग्य करिअर निवड शक्य नाही, हे सांगताना त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतःच्या गुणधर्मांची जाणीव करून देणारे प्रात्यक्षिकही सादर केले. या कार्यशाळेत गावातील १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पोलीस पाटील नारायण चौधरी व मधुबन फार्मच्या संचालिका स्वप्नाली कांबळे यांचे विशेष सहकार्य लाभले. महा.अंनिसच्या कार्यकर्त्या आरती नाईक यांनी पुढील काळातही विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टीकोनावर आधारित मार्गदर्शन व शैक्षणिक सहकार्य मिळत राहील, असे आश्वासन दिले. ही कार्यशाळा केवळ मार्गदर्शनापुरती मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात भर घालणारी ठरली, असे मत पालक व ग्रामस्थांनी व्यक्त केले.

**संवाद कार्यशाळा**

**वाशिम :** ११ जून रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने वाशिम येथे संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेस महा. अंनिसचे राज्य प्रधानसचिव गजेंद्र सुरकार व विनायक सावळे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कु.साक्षी गिरी यांनी छ. शिवरायांच्या पोवाड्याच्या दमदार सादरीकरणाने केली. त्यांच्या सुस्वर, जोशपूर्ण आवाजाने कार्यक्रमाला ऊर्जा मिळाली. त्यानंतर संवादाची औपचारिक सुरुवात होऊन उपस्थितांचे परिचय घेण्यात आले. मागील कालावधीतील कार्याचा आढावा जिल्हा कार्याध्यक्ष विजय शिंदे यांनी सादर केला. त्यानंतर कार्यशाळेतील प्रमुख सत्रात आगामी कार्याचे नियोजन, अंमलबजावणी, जबाबदाऱ्या, प्रशिक्षण शिबिरे, शिक्षक प्रशिक्षण उपक्रम आणि संघटनबांधणी या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा झाली.

प्रत्येक घटकाच्या जबाबदाऱ्या ठरवत पुढील काही महिन्यांसाठी कार्याचा ठोस आराखडा ठरवण्यात आला. राज्यपातळीवरील मार्गदर्शक मंडळींनी कार्यकर्त्यांना उद्देशून प्रेरणादायी मार्गदर्शन केले व कार्यशैली अधिक परिणामकारक कशी होईल यावर प्रकाश टाकला. कार्यशाळेला वाशिम जिल्ह्यातील महा. अंनिसचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीतून संघटनेच्या कार्याला नवसंजीवनी मिळाली असून, वैज्ञानिक दृष्टीकोन व विवेकाधिष्ठित समाजनिर्मितीसाठी अधिक संघटित पद्धतीने काम सुरू ठेवण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

**कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर**

**नवी मुंबई :** १८ मे रोजी नवी मुंबई जिल्हा शाखेच्या वतीने कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन कोपरखैरणे येथील ज्ञानविकास विद्यालयात करण्यात आले. शिबिरात वैज्ञानिक दृष्टीकोन, संघटन कौशल्ये व प्रभावी संवादकौशल्य यावर भर देण्यात आला. शिबिराचे उद्घाटन 'दैनिक नवे शहर'चे कार्यकारी संपादक राजेंद्र घरत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी कार्यकर्त्यांना माध्यमांच्या भूमिकेची जाण करून दिली व समाजात विवेकी विचार पसरवण्यासाठी त्यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त अधिकारी अरविंद सोनटक्के होते. प्रमुख पाहुणे

म्हणून उपस्थित सेवानिवृत्त नेव्ही ऑफिसर एस. एच. कलावत यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण शिबिराला मच्छिंद्रनाथ मुंडे, सुशीला मुंडे, नंदकिशोर तळाशिलकर व अशोक निकम यांची उपस्थिती लाभली. त्यांनी अंधश्रद्धेविरोधात चळवळीतील कार्यकर्त्यांची भूमिका स्पष्ट करत दीर्घकालीन लढ्याची गरज अधोरेखित केली. स्थानिक कार्यकर्ते कॅप्टन सी. जे. लेपांडे, दीपरत्न सुरडकर, गजानन जाधव, निवास पडळकर, जयश्री मोरे, प्रदीप कासुर्डे, राजेंद्र पंडित आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुढाकार घेतला.

### 'शोध सावित्रीच्या लेकीचा' उपक्रम

**मुंबई :** १० जून रोजी वटपौर्णिमेनिमित्त महाराष्ट्र अंनिस महिला सहभाग विभागातर्फे 'शोध सावित्रीच्या लेकीचा' या अभियानांतर्गत दादर विभागात दोन उपक्रम राबविण्यात आले. पहिला उपक्रम दादर पोलीस वसाहतीत झाला, जिथे वडाच्या पूजेसाठी आलेल्या महिलांची मानसिकता समजून घेण्यासाठी प्रश्नावलीद्वारे संवाद साधण्यात आला. महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत 'सत्यवानाची सावित्री की ज्योतिबाची सावित्री?' या प्रश्नावर वैविध्यपूर्ण मते मांडली. काहींनी परंपरा मान्य केल्या तर काहींनी विवेकी विचारांकडे झुकताना पुरुषांनीही व्रत करावं, अशी मते व्यक्त केली. हा संवाद महिलांच्या बदलत्या मानसिकतेचे प्रतिबिंब ठरला. दुसऱ्या उपक्रमांतर्गत राऊळ मैदान, गोखले रोड, दादर येथे वृक्षारोपण करण्यात आले. बीएमसीच्या टँकर्समार्फत झाडांची निगा राखली जाईल याची खात्री करून, उपक्रम पर्यावरणपूरक दृष्टीकोनातून राबवण्यात आला. या दोन्ही उपक्रमांतून स्त्रियांच्या विचारांत हळूहळू होत असलेला बदल आणि नव्या पिढीतील धाडसी वृत्ती प्रकर्षाने जाणवली. 'सावित्रीच्या लेकी' परिवर्तनाच्या वाटेवर वाटचाल करत असल्याचे या उपक्रमांतून स्पष्ट झाले.

### 'पुरुषभान' कार्यक्रमात स्त्रीसन्मानाचा संदेश

**सफाळे (जि. मुंबई) :** ४ जून रोजी लायन्स क्लब, इंग्लिश मिडियम हायस्कूल, अगरवाडी (सफाळे) येथे सेक्स एज्युकेशन अंतर्गत 'स्त्रीसन्मानासाठी पुरुषभान' या संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात अर्चना सोनावणे यांनी पीपीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी खुला व प्रभावी संवाद साधला.

या सत्रात 'स्व'ची ओळख, कुमारावस्थेतील शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक व बौद्धिक बदल आणि या बदलांचा व्यक्तिमत्त्व विकास व जीवनावर होणारा परिणाम या मुद्द्यांवर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. तसेच, युवकावस्थेच्या उंबरठ्यावर प्रेम, आकर्षण, नकार व विविध भावनिक स्थितींचे वैज्ञानिक विश्लेषणही विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत सादर करण्यात आले. कार्यक्रमाचा शेवट सर्व सहभागींनी 'चला गड्यांनो पाऊल टाका पुढं रं...' हे प्रेरणादायी गीत गात उत्साहात केला. हा उपक्रम विवेकी लैंगिक शिक्षणासोबत स्त्री-पुरुष समानतेच्या मूल्यांचा पुरस्कार करणारा आणि नव्या पिढीला सजग करणारा ठरला. आप्पा लोखंडे यांनी स्त्रीसन्मान प्रतिज्ञा प्रत शाळेसाठी भेट दिली. अर्चना सोनावणे (दादर शाखा कार्याध्यक्ष), आप्पा लोखंडे (पालघर शाखा कार्याध्यक्ष), धनंजय लोखंडे, अनिल जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### महिलांच्या हस्ते वृक्षारोपण

**लातूर :** वटसावित्री पौर्णिमेनिमित्त लातूर शहर व जिल्हा शाखेच्या वतीने वृक्ष लागवडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. 'वारसा कोणाचा? सत्यवानाच्या सावित्रीचा की, ज्योतिबाच्या सावित्रीचा...' या प्रेरणादायी थीमवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पौराणिक परंपरेला आधुनिक व पुरोगामी दृष्टिकोनाची जोड देत समाजात विवेकी विचारांचा पगडा वाढवण्याचा यामागे हेतू होता. कार्यक्रमाचे उद्घाटन पोलीस निरीक्षक बबिता वाकडकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र अंनिसचे राज्य अध्यक्ष माधव बावगे होते. लातूरचे ज्येष्ठ पत्रकार श्याम जैन यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून आपले विचार मांडले. या कार्यक्रमाला राज्य सरचिटणीस उत्तरेश्वर बिराजदार, मिश्र व सत्यशोधकीय विवाह विभाग राज्य कार्यवाह रणजीत आचार्य, जिल्हा उपाध्यक्ष अजित निंबाळकर, जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. दशरथ भिसे, प्रधानसचिव सुधीर भोसले, विवेक वाहिनीचे जिल्हा कार्यवाह हनुमंत मुंडे, जिल्हा पदाधिकारी बाळासाहेब जगताप व गंगाधर गवळी यांची उपस्थिती लाभली. लातूर शहर कार्याध्यक्ष डॉ. गणेश गोमारे, आजम पठाण, डॉ. कोमल गोमारे, रोहिणी गोवंडे (जैन) व धृव बावगे या स्थानिक

कार्यकर्त्यांनीही कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे महिलांच्या हस्ते करण्यात आलेली वृक्ष लागवड. सामाजिक समता, पर्यावरण संवर्धन आणि महिलांच्या सशक्तीकरणाचा विचार या उपक्रमातून प्रभावीपणे पुढे आला. संपूर्ण कार्यक्रमाचे रेकॉर्डिंगही करण्यात आले असून, भविष्यात याचा उपयोग जनजागृतीसाठी करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून अंधश्रद्धा नाकारून विवेकशील विचारांचा प्रसार करण्याचा संदेश पुन्हा एकदा अधोरेखित झाला.

### 'व्रत, वैकल्य आणि समज-गैरसमज'

**पुणे :** ११ जून रोजी पुणे शहर शाखेच्या वतीने 'आम्ही समतावादी अभियान' अंतर्गत आयोजित 'स्त्रियांचे आरोग्य : व्रत, वैकल्य, समज-गैरसमज' या विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या व्याख्यानात डॉ. राधा संगमनेरकर (स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ज्ञ) यांनी सखोल मार्गदर्शन केले. उपवास, आहारातील चुकीच्या कल्पना, मासिक पाळीविषयी अंधश्रद्धा, सणांच्या काळात मासिक पाळी टाळण्यासाठी वापरली जाणारी औषधे आणि त्यांचे आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम आदी विषयांवर त्यांनी थेट व तर्कशुद्ध भाष्य केले. कार्यक्रमाची सुरुवात ॲड. परिक्रमा खोत यांच्या 'समतेच्या वाटेनं' या स्फूर्तिदायक गीताने झाली. रतन नामपल्ले यांनी प्रमुख वक्त्यांचा ओघवता परिचय करून दिला. माधुरी गायकवाड यांनी अंनिसची भूमिका स्पष्ट केली. सूत्रसंचालनाची जबाबदारी रोहित घोगरे यांनी पार पाडली, तर वैशाली कळसाईत यांनी आभार मानले. सुमारे ८० जण या ऑनलाईन कार्यक्रमात पूर्णवेळ सहभागी होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये मयूर पटारे, नम्रता ओव्हाळ, वनिता फाळके (काकू), विनोद खरटमोल, सम्यक वि. म., रतन नामपल्ले, यांनी परिश्रम घेतले.

### हितचिंतक, देणगीदार, जाहिरातदार व कार्यकर्त्यांचा मेळावा

**मोहोळ :** येथील लोकसेवा कॉन्फरन्स हॉलमध्ये ७ जून रोजी मोहोळ शाखेच्या हितचिंतक, देणगीदार, जाहिरातदार व कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. मेळाव्याला प्रमुख मार्गदर्शक म्हणून विचारवंत, समाजसेवक, वैज्ञानिक लेखक तथा अंनिसचे मार्गदर्शक अच्युत गोडबोले उपस्थित होते.

देशात प्रचंड विषमता आहे. मजबूत आणि टिकाऊ वस्तूंच्या पुरवठ्याऐवजी 'यूज ॲन्ड थ्रो'चा पुरवठा होत आहे. लोकांना चंगळवादाकडे ढकलले जात आहे. देव, धर्म आणि त्यावरील श्रद्धा ही बाब वैयक्तिक न राहता ती रस्त्यावर आणून सर्वसामान्यांचे शोषण करते तेव्हा ती अंधश्रद्धा बनते असे मत अच्युत गोडबोले यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य श्रीधर उन्हाळे हे होते.

अध्यक्षस्थानी अंनिसचे जिल्हाध्यक्ष नंदकुमार फाटे होते. डॉ. प्रमोद पाटील, मनोज मोरे, ॲड.श्रीरंग लाळे, ॲड.विनोद कांबळे, डॉ.मिलींद लामगुंडे, डॉ. शेंडे, बालाजी शेळके, अरुण भोसले, मनोहर गोडसे, प्रा.संभाजी चव्हाण, आकाश फाटे, सचिन फाटे, ओम कळसे, विजय चांदणे, बिरमल खांडेकर, संगिता फाटे, डॉ. स्मिता पाटील, मंजूषा कादे, अनुराधा चवरे यांच्यासह जाहिरातदार, हितचिंतक, प्रमुख मान्यवर व अंनिसचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे दादा चांदणे, ॲड. गोविंद पाटील, सुधाकर काशीद व धर्मराज चवरे यांनी मनोगते व्यक्त केली. वक्त्यांचा परिचय नवनाथ साळी यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अश्विन दळवी यांनी केले.

### कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर

**भंडारा :** जिल्हा शाखा भंडाराच्या वतीने एकदिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर मैत्री बौद्धविहार, भंडारा येथे उत्साही वातावरणात संपन्न झाले. प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे आणि सुशीला मुंडे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीची गरज, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रसार आणि सामाजिक बदलात कार्यकर्त्यांची भूमिका या मुद्द्यांवर सखोल संवाद साधत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात बुवाबाजी विभागाचे राज्य सहकार्यवाह विष्णुदास लोणारे, कार्याध्यक्ष प्रा. युवराज खोब्रागडे, नितेश बोरकर, डॉ. नागलवाडे, प्रा. नरेश आंबिलकर, चंद्रशेखर भीवगडे, चोपराम गडपाईले, कविता लोणारे, त्रिवेणी वासनिक, सुषमा बनसोड यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते सहभागी झाले होते. शिबिरातून कार्यकर्त्यांमध्ये चळवळीबाबतची ऊर्जा, दिशा आणि

जागरूकता अधिक बळकट झाली असून, आगामी सामाजिक उपक्रमांना बळ देण्यासाठी ही बैठक मोलाची ठरली.

### गडचिरोलीत वृक्षारोपण

**गडचिरोली :** १० जून रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महिला सहभाग विभाग, शाखा गडचिरोली व नवेगाव मुरखडा आणि नारीशक्ती संघटना गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने इंदिरा महाविद्यालय, चामोर्शी रोड, गडचिरोली येथील परिसरात वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. घरासमोरील मोकळी जागा, आनंदनगर परिसर व मैदानात शिसव, कडुनिंब, करंजी, सिताफळ, आंबा आदी विविध प्रकारचे वृक्ष लावण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात गडचिरोली शहर शाखेचे कार्याध्यक्ष उपेंद्र रोहनकर यांनी लिहिलेल्या 'झाडे लावू या रे गड्या...' या प्रेरणादायी गीताने झाली. हे गीत उपस्थितांनी सामूहिकपणे गायले आणि पर्यावरण संवर्धनाचा संकल्प घेतला. कार्यक्रमाला महिला सहभाग विभाग प्रमुख सुधाताई चौधरी, सांस्कृतिक विभाग प्रमुख अलका गुरनुले, युवा सहभाग प्रमुख शीतल मानकर, तसेच राज्य सरचिटणीस विलास निंबोरकर, जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव कोठारे, शाखा अध्यक्ष लहुजी रामटेके, उपाध्यक्ष वामनराव भोयर आणि अनेक मान्यवर व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गडचिरोली शाखेने या उपक्रमासाठी रोपांची उपलब्धता करून दिली. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाबरोबरच महिलांच्या सक्रिय सहभागाचे कृतिशील दर्शन घडले. महा. अंनिस व नारीशक्ती संघटनेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### वैज्ञानिक दृष्टीकोनावर संवाद

**कोल्हापूर :** शेल्टर असोसिएटस व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आयोजित दि. २२ मे रोजी बोद्रेंनगर येथे वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयावर संवाद पार पडला. या कार्यक्रमात मुक्ता निशांत यांनी श्रद्धा, अंधश्रद्धा, वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयावर मांडणी केली. दैनंदिन जीवनातील उदाहरणे समजून घेत बाबा, बुवा, भगत कसे चमत्कार दाखवून माणसांची दिशाभूल करतात. यासंदर्भात चमत्कार सादरीकरण करण्यात आले. सर्व वयोगटातील ५० मुले व मुली शिबिरामध्ये सहभागी झाले. जिल्हा प्रशिक्षण विभाग कार्यवाह निशांत व निर्मिक, महादेव कांबळे, मेघा लोखंडे उपस्थित होते.

### समतेच्या रंगात रंगलेलं पाऊल

**मुंबई :** येथे नुकत्याच पार पडलेल्या प्राईड वॉकमध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा उत्साही सहभाग पाहायला मिळाला. 'युतक चॅरिटेबल ट्रस्ट' यांच्या आयोजनाखाली पार पडलेल्या या समतेच्या स्नेहयात्रेत अंनिसच्या पथकाने प्रथमच सहभाग घेतला. पनवेलहून आरती, महेंद्र, जेसिका, हर्षल, तेजल आणि वरद; मुंबईहून रुपेश, तर पुण्याहून रतन आणि माधुरी अशा कार्यकर्त्यांनी विविधतेचा स्वीकार, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यांचा सन्मान करत सहभाग नोंदवला. प्री-प्राईड कार्यक्रमात खोपोलीचे संदीप व महेंद्र आणि पुण्याची परिक्रमा यांनी चमत्कार सादर केले.

प्राईड वॉक ही केवळ आनंदाची मिरवणूक नसून, ती आत्मसन्मानाची आणि अस्मितेची जाहीर अभिव्यक्ती आहे याची प्रचिती अंनिसच्या कार्यकर्त्यांना आली. रस्त्यावर चालणारी पावले केवळ शारीरिक हालचाली नव्हत्या, तर विचारांची आणि तत्त्वांची गती होती. विविध रंगांची पताका, घोषणांनी गजबजलेले वातावरण आणि प्रेमळ, मुक्तहास्य हसणारे अनोळखी चेहरे, हे दृश्य समावेशकतेचं खऱ्या अर्थानं प्रतीक ठरलं. लैंगिकता, लिंग ओळख आणि प्रेम यामध्येही वैज्ञानिक दृष्टीकोन आणि समतेची गरज आहे, असं मत अंनिसच्या कार्यकर्त्यांनी स्पष्टपणे मांडलं. प्राईड वॉकमध्ये सहभाग घेणं ही केवळ उपस्थिती नसून एक सामाजिक भूमिका आहे, असं मत व्यक्त करत अंनिसच्या कार्यकर्त्यांनी या चळवळीला आपला सक्रिय पाठिंबा दर्शविला. विविधतेच्या या उत्सवात अंनिसचा सहभाग हा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि समतेच्या मूलभूत तत्त्वांचा जागर करणारा ठरला.

### 'क्रांती दीप' ग्रंथाचे प्रकाशन

**अहिल्यानगर :** १२ जून रोजी येथील हमाल पंचायत येथे ज्येष्ठ कामगार नेते कॉ. बाबा आरगडे यांच्या कार्यावर आधारित 'क्रांती दीप' या गौरवग्रंथाचा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने कॉ. बाबा आरगडे यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारप्रसंगी माजी अध्यक्ष अविनाश

पाटील, राज्य अध्यक्ष माधव बावगे, प्रधानसचिव डॉ. ठकसेन गोराणे, बुवाबाजी संघर्ष विभागाच्या राज्य कार्यवाह ॲड. रंजना गवांदे यांच्यासह जिल्ह्यातील विविध शाखांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. अंनिसच्या सामाजिक कार्यात कॉ. बाबा आरगडे यांचा भूतपूर्व सहभाग व योगदान लक्षात घेता, त्यांना सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमानंतर अंनिसचे जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद भारुळे यांच्या निवासस्थानी भोजनाचा कार्यक्रम व त्यानंतर जिल्हा कार्यकारिणी बैठक पार पडली. या बैठकीत पुढील निर्णय घेण्यात आले. आगामी महिन्यात जिल्ह्यातील शाखांना भेटी देऊन संघटनात्मक आणि उपक्रमात्मक कामांसाठी प्रेरणा, प्रोत्साहन व मार्गदर्शन केले जाईल. शाळा-महाविद्यालयांमध्ये सप्रयोग व्याख्याने आयोजित करून नव्या कार्यकर्त्यांची भर घालणे, कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय, अंनिप वर्गणीदार वाढविण्याचे प्रयत्न करणे, पूर्वतयारी करून विविध उपक्रम हाती घेणे, राज्य कार्यकारिणी बैठक अहिल्यानगरमध्ये आयोजित करण्यासाठी प्रयत्नशील राहणे, या बैठकीस एकूण २१ पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. बैठक सकारात्मक वातावरणात पार पडली असून, आगामी काळात अहिल्यानगर जिल्ह्यातील अंनिसची संघटनात्मक बांधणी अधिक बळकट करण्यावर भर देण्यात येणार आहे.

### 'विवेकी व्यक्तिमत्त्व' विषयावर व्याख्यान

**शहादा :** येथील पूज्य सानेगुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या कृषी महाविद्यालयात महाराष्ट्र अंनिसचे राज्य प्रधानसचिव विनायक सावळे यांचे 'विवेकी व्यक्तिमत्त्व' या विषयावर व्याख्यान पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एल.पटेल हे होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विनायक सावळे म्हणाले की, व्यक्ती म्हणून जीवन जगताना 'दिसण्यापेक्षा असणे' खूप महत्त्वाचे असते. जीवनात नुसती इच्छा असून चालत नाही. मेहनत, कष्ट, कार्य, सकारात्मक विचारानेच जीवन सुखकर होते. भावनांचा परिणाम आपल्या क्षमता व कामांवर पडत असतो. जीवनात घडणाऱ्या घटना मेंदूवर परिणाम करतात व त्या परिणामांचा आपल्या विचारांवर प्रभाव पडतो. भाव, निद्रा, मैथुन, प्रेरणा आदी भावनांचा परिणाम आपल्या वागण्यावर होतो. भय, राग, संताप, घृणा, तिरस्कार, कटकटीने जगण्यात अडचण निर्माण होते. प्राचार्य डॉ. प्रकाश पटेल यांनी अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यात सकारात्मक व विवेकी विचारांचा अवलंब करून जीवन सुंदरतेने जगावे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. दिलीप सूर्यवंशी यांनी केले.

### बकरी ईदनिमित्त रक्तदान शिबिर

**लातूर :** बकरी ईदनिमित्त बकऱ्याची कुर्बानी देण्याऐवजी माणसाने माणुसकीसाठी रक्तदान करावे, या प्रेरणादायी संकल्पनेतून लातूर शाखेच्या वतीने विलासराव देशमुख शासकीय रक्तपेढी, लातूर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन राज्य प्रधानसचिव रुक्साना मुल्ला यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी राज्य सरचिटणीस उत्तरेश्वर बिराजदार होते.

प्रमुख पाहुणे म्हणून विविध उपक्रम राज्य कार्यवाह अनिल दरेकर, मिश्र व सत्यशोधकीय विवाह विभाग राज्य कार्यवाह रणजीत आचार्य, जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. दशरथ भिसे, जिल्हा प्रधानसचिव सुधीर भोसले, बाळासाहेब जगताप, विवेकवाहिनी जिल्हा कार्यवाह हनुमंत मुंडे तसेच लातूर शहर कार्याध्यक्ष डॉ. गणेश गोमारे हेही मान्यवर उपस्थित होते. शिबिराच्या आयोजनात स्थानिक कार्यकर्ते इम्रान सय्यद, जाकीर शेख व कबीर सय्यद यांचे मोलाचे योगदान लाभले. या सामाजिक उपक्रमातून धर्म, जात, परंपरा यांच्यापलीकडे जाऊन माणुसकीच्या भावनेतून रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शिबिरात सहभाग घेतला आणि एक सकारात्मक सामाजिक संदेश दिला की, खऱ्या अर्थाने 'कुर्बानी' ही माणसासाठी असावी. हा उपक्रम अंधश्रद्धा निर्मूलन, विवेकी विचार आणि सामाजिक एकोपा यांचा आदर्श ठरला.

**पनवेल :** बकरी ईद (ईद-उल-अजहा) निमित्त शाखा पनवेलच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत ६ जून रोजी रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी हा उपक्रम सामाजिक सलोखा, मानवता आणि आरोग्यवर्धनाचा संदेश देत

पार पडला.

दारुल अमन ट्रस्टच्या पुढाकाराने, तसेच रोटरी ब्लड बँक, क्रिटीकेअर लाईफलाइन हॉस्पिटल, पनवेल आणि शंकरा आय हॉस्पिटल यांच्या सहकार्याने नवीन पनवेल येथील मस्जिदीच्या आवारात हे शिबिर पार पडले. यंदा शिबिरात आरोग्य तपासणी आणि नेत्रतपासणी सेवाही उपलब्ध करून देण्यात आल्या. या शिबिराचा लाभ शंभरहून अधिक नागरिकांनी घेतला, तर २३ जणांनी स्वखुशीने रक्तदान करत सामाजिक कर्तव्य बजावले. 'एक थेंब तुमचं रक्त, कुणाचं तरी आयुष्य वाचवू शकतं!' या प्रेरणादायी घोषवाक्याने संपूर्ण परिसरात जनजागृतीचा सकारात्मक संदेश पोहोचवला. कार्यक्रमास दारुल अमन ट्रस्टचे ए. एम. इनामदार, अल्लाउद्दीन शेख, असिफ कुरेशी, आरती नाईक, बगाडे काका, प्रवीण जठार, बाबासाहेब चिमणे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. या उपक्रमात महा. अंनिस पनवेल शाखेसोबत महाराष्ट्र मायनॉरिटी एनजीओ फोरम, पनवेल, ए. एफ. टी. ट्रस्ट पनवेल, मक्त-ए-नुरुल उलूम, आई समाजकल्याण संस्था वावंजे, संविधान प्रचारक, सर्वोदय, ग्रामस्वराज्य समिती, महाराष्ट्र आणि कुष्ठरोग निवारण समिती, शांतीवन यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. धर्म, जात, वर्ग या भिंती ओलांडून एकत्र येत मानवतेसाठी रक्तदान आणि आरोग्य सेवा हा आदर्श समाजनिर्मितीचा वस्तुपाठच या शिबिराने घालून दिला.

**नंदुरबार :** नंदुरबार शाखेकडून बकरी-ईद सणाचे औचित्य साधून जिल्हा रुग्णालय, नंदुरबार येथे रक्तदान सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नरेश पाडवी यांचे हस्ते रक्तदान सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. बकरी ईद सण हा कुर्बानीचा संदेश देणारा सण असून यानिमित्त प्राण्यांची कुर्बानी न देता स्वतःच्या रक्ताची कुर्बानी अर्थात रक्तदान करून अनेकांचे प्राण वाचू शकतात हा विधायक व पर्यावरणपूरक संदेश देण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांच्याकडून मागील काही वर्षांपासून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. नंदुरबार शाखेकडून आयोजनाचे हे रक्तदान शिबिराचे तिसरे वर्ष होते.

रक्त संकलन विभाग प्रमुख डॉ. रमा वाडेकर तसेच जयेश सोनवणे आणि कर्मचारीवृंद यांनी रक्त संकलनाची प्रक्रिया पार पाडली. महा. अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष वसंत वळवी, नंदुरबार शाखा कार्याध्यक्ष सूर्यकांत आगळे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य फिरोज खान, प्रवीणकुमार धांदरे यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. काही तांत्रिक आणि वैद्यकीय कारणास्तव इच्छा असूनही काही कार्यकर्त्यांना रक्तदान करता आले नाही. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी नंदुरबार अंनिस शाखेचे प्रधानसचिव बलदेव वसईकर, संदीपकुमार आखाडे, राजू चौधरी, पराग जगदेव, राजेंद्र पिंपळे, मंगेश वाघमारे, सुधीर पानपाटील आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

**कोल्हापूर :** बकरी ईदनिमित्त महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या वतीने छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय रक्तपेढी, कोल्हापूर येथे रक्तादान शिबिर संपन्न झाले. यावेळी सर्वधर्मीय रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक सलोखा जपला. या शिबिरात प्रा. सिकंदर तांबोळी, इरफान वारुणकर, सलीम कागवाडे, कृष्णात स्वाती, मारुती भंडारी, तुषार नाईक, विजय पाटकर, इर्शाद वडगावकर, निशांत सुनंदा विश्वास, सनी गायकवाड, किरण कुसाळे (माजी सरपंच ग्रामपंचायत, वळिवडे) सागर बोरगे, कपिल मुळे, दिवाकर कुंभार, महादेव शिंगे यांनी रक्तदान केले. यावेळी जिल्हा अंनिस कार्याध्यक्ष प्रमोद शिंदे, डॉ. अनमोल कोठाडिया, गुलाब अत्तार, सुरज गायकवाड, संघसेन जगतकर, मयुरी जगतकर, रमेश वडणगेकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

●

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाचे आपण आधारस्तंभ आहात! समिती आपली ऋणी आहे!**

---

**यशवंत दगडू सपकाळे**
**डॉ. नजमुद्दीन दुलेखाँ तडवी**
**फिरोज हैदर तडवी**
**विद्याधर रामदास पाटील**
**प्रभाकर एकनाथ पाटील**

# महा.अंनिसचे विविध उपक्रम



बकरी ईद निमित्त रक्तदान शिबीर (नंदुरबार)
डॉ. नरेश पाडवी, वसंत वळवी, सूर्यकांत आगळे आणि साथी




विवेकी व्यक्तिमत्व या विषयावर मार्गदर्शन करताना
राज्य प्रधान सचिव विनायक सावळे (शहादा)



वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयावर मांडणी करताना
मुक्ता निशांत (कोल्हापूर)



बकरी ईद निमित्त रक्तदान शिबीर (कोल्हापूर)
प्रा. सिकंदर तांबोळी, कृष्णात स्वाती, कपिल मुळे आणि साथी



कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर (भंडारा)
मच्छिंद्रनाथ मुंडे, सुशिला मुंडे, विष्णुदास लोणारे आणि साथी



प्राईड वॉक मध्ये महा. अंनिसचा सहभाग (मुंबई)
आरती, महेंद्र, जेसिका, हर्षल, तेजल, रुपेश, माधुरी आणि साथी



बकरी ईद निमित्त रक्तदान शिबीर (लातूर)
रुकसाना मुल्ला, उत्तरेश्वर बिराजदार, अनिल दरेकर आणि साथी



कॉ. बाबा आरगडे यांच्या कार्यावर आधारित 'क्रांती दीप'
गौरव ग्रंथाचा प्रकाशन सोहळा

ISSN : 2584-0398 Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष चौथे अंक सातवा, ५ जुलै २०२५ (मासिक), पृष्ठसंख्या ४४, किंमत रू. २०/-**
Andhshradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 4 Issue 7, 5th July 2025 (Monthly), Pages 44, Price Rs. 20/-




संविधान सन्मान रॅली (शहादा)



वटपौर्णिमेनिमित्त महिलांच्या हस्ते वृक्षारोपण (गडचिरोली)



संवाद कार्यशाळा (वाशिम) विनायक, गजेंद्र सुरकार आणि साथी



वटपौर्णिमेनिमित्त महिलांच्या हस्ते वृक्षारोपण (लातूर)




कार्यकारी समिती




राज्य कार्यकारिणी

**Printed Book Post**

**प्रेषक,**

अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ______________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.